मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ६९ ❖ संपादिकाः डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे(पृष्ठ १२०) ❖ मार्च २००७ (फक्त खाजगी वितरणासाठी)

दूरध्वनी:२४१५०८८९ (वडाळा, मुंबई ४०००३१); **ई-मेलः maratheparivar@yahoo.co.in**

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

## *संपादकीय* भूमिका मराठी साहित्य संमेलनात 'मराठे'

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेम नमस्कार. संपादिका या नात्याने हा माझा दुसरा व हितगुजचा ६९वा अंक. या पूर्वीच्या माझ्या संपादनातून सिद्ध झालेल्या डिसेंबर २००६च्या (६८व्या) अंकाचे आपण उत्साहाने स्वागत केले आणि भरभरून प्रतिसाद दिलात त्याबद्दल मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करताना मला विशेष आनंद होत आहे. धन्यवाद.

अनेक कुलबांधवांनी पत्रे पाठवून तर कोणी दूरध्वनीवरून अंक उत्कृष्ट आणि चांगला वाचनीय झाल्याचे कळविले आहे. अंक चांगला केव्हा होतो? जेव्हा त्या अंकातून ललित साहित्य कृतीद्वारा उत्कट भावना, कल्पना, संवेदनाक्षम मन प्रकट होते तेव्हा. आपल्या मराठे परिवारातलेच लेखक, कवी, विचारवंत हे जेव्हा सहृदयतेने लिहितात, भावनांना हात घालणारे लेखन करतात तेव्हा आपल्या हितगुजचे अंतरंग सौंदर्य वाढते व अंक वाचनीय, हवाहवासा वाटू लागतो. यात माझे काहीही विशेष श्रेय नाही हे नम्रपणे नमूद करते.

हितगुज म्हणजे एखाद्या संस्थेची, घराण्याची ठोकळेबाज माहिती असलेली पुस्तिका नाही. केवळ कोरडेपणाने लिहिलेला वृत्तविशेष, आराखडा, अहवाल नाही. आपल्या हितगुजचे स्वरूप असे राहू नये ही काळजी घेण्यावर माझा कटाक्ष असेल.

हितगुजमध्ये आपल्या महिला वर्गाला बोलते-लिहिते केले पाहिजे असे मला वाटते.

*(पुढील मजकूर पृ. १८वर)*

*(नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या ८० व्या मराठी साहित्य संमेलनात प्रतिष्ठानचे एक संस्थापक श्री. वामनराव म्हणजे आपले 'वा.ग.' यांना लोकसत्तेच्या छायाचित्रकाराने 'मराठी साहित्य संमेलनातील इंग्रजी वाचन संस्कृती' हा मार्मिक मथळा देऊन अलगद टिपले व विदर्भातील लाखो वाचकां पर्यंत नेऊन ठेवले. अशाच प्रकारे सुप्रसिद्ध साहित्यिक 'ह.मो.' मराठे यांना 'टारगेट' करून अभिरूप न्यायालयात आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले त्याची चटकदार चित्तरकथा पृ. १८वर वाचा.-संपादक)*



मराठी साहित्य संमेलनातील इंग्रजी वाचन संस्कृती !

---

## मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र.ई.७९१८ (मुं.ता.१२-१-१९८१) मराठे उद्योग भवन,आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी,मुंबई ४०००२५.

**दूरध्वनी:२४३०२४५३ . वेबसाईट : www.marathepratishthan.org**

❖ **संपादकीय सहाय्य व अक्षरजुळणी : सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६) ;** ❖

**पत्रव्यवहाराचा पत्ता:**

(१)संपादिका:डॉ.सौ.सुमेधा प्र मराठे ८/१३, सहकार नगर, वडाळा-प. मुंबई ४०००३१**ईमेल**-prabhakar_marathe@yahoo.com

(२) सहायक संपादकः श्री.सीताराम गो. खांबेटे ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९

**ईमेल**(1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in दूरध्वनी: २६८३६९९४;

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.(मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करावा म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मागील डिसेंबर-फेब्रुवारी या तिमाहीत दि.१५-१२-०६,१३-१-०७ व १०-२०-०७ या दिवशी कार्यकारी मंडळाच्या बैठका झाल्या.

१. दि, १५-१२-०६ च्या बैठकीमध्ये वामन शिवराम मराठे(पृ.४४४),यांची हितगुजसाठी मनीऑर्डर, आणि घाटकोपरच्या गजानन भास्कर मराठे (पृ.४२७)यांच्या मातोश्रींच्या निधनसंबंधीच्या पत्राची नोंद घेण्यात आली..

२. दि.१३-१-०७ च्या बैठकीत विलेपार्ल्याच्या जयंत श्रीधर विद्वांस(पृ.६४८)ं यांचे बंधू अरविंद यांचे निधनवृत्त, गोमंतक मराठे परिवार सेवा समितीचे मेळावा निमंत्रण व गोव्याच्या विष्णू पांडुरंग मराठे (पृ.५२२) यांच्या पत्रांची नोंद घेण्यात आली. मकर संक्रांति निमित्त ठाण्याचे श्री.प्रमोद कृ.मराठे (पृ.३७६) यांनी तिळगूळाचे लाडू वाटले.

३. दि.१०-०२-०७ च्या बैठकीत बिंबल च्या परशुराम संदीप मराठे (पृ.५२१) याच्या व्रतबंधाच्या निमंत्रण पत्रिकेची नोंद घेण्यात आली. हितगुजचे अंक उशीरा मिळतात ते वेळेवर मिळण्याची चर्चा झाली. श्री. विनायक केशव मराठे(पृ. ०२०) यानी हितगुज विषयी काही अपेक्षा व्यक्त केल्या. त्या पत्ररूपाने प्रसिद्धीस द्याव्यात असे ठरविण्यात आले. सभा चालू असतेवेळी श्री चिंतामण महादेव(पृ.२२२) यांच्या आत्यांच्या निधनाचे वृत्त कळले. श्री.मोहनराव मराठे य(पृ.३६५)यांनी एकेक घराण्याचा कुलवृत्तांत करावा असे सुचविले. विख्यात साहित्यिक द.पां. खांबेटे(पृ.६८६) यांचे भाचे श्री. सतीश जोशी पटणी कंप्यूटर कंपनीमध्ये एक्झिक्यूटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट आहेत यांचे विषयी म.टा.मधील परिचय-वृत्त प्रभाकर मराठे यानी प्रसिद्धीस दिले. तसेच त्यांच्या व सुमेधाताईंच्या विवाहाच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी पेढे वाटले. त्यांना उपस्थितांनी शुभेच्छा देऊन बैठक संपली.

## स्थानिक कार्यक्रम मेळावे इत्यादि

या तिमाहीत मराठे प्रतिष्ठानचा २७ वा वर्धापनदिन पुणे शाखेतर्फे २५-१२-२००६ रोजी साजरा झाला. त्याचा वृत्तांत सोबत दिला आहे.

**डिसेंबर २००६ ते फेब्रुवारी २००७ या तिमाहीत प्रतिष्ठानकडे प्राप्त झालेल्या विविध रकमांचा तपशील.**

| पावती.क्र. | देणगीदार | हेतू | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| मुं. १६७० | श्री.माधव रघुनाथ मराठे,(पृ.३४७) पिलीभीत | झेरॉक्स-कुलवृत्तांत विक्री | ६०० |
| मुं. १६७१ | श्री.रमाकांत मा. विद्वांस,(पृ.६२३) माहीम | झेरॉक्स-कुलवृत्तांत विक्री | १२०० |
| मुं. १६७२ | श्री.प्रभाकर दा. मराठे,(पृ.१२०) वडाळा | हितगुज जाहिरात(डिसेंबर) | ६०० |
| मुं. १६७३ | श्री.अशोक गजानन मराठे,(पृ.४२७)घाटकोपर. | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| मुं. १६७४* | श्री.अनंत सदाशिव मराठे,(पृ.०८७)घाटकोपर. (पिता श्री. सदाशिव गोविंद यांच्या अमृतमहोत्सवी जन्मदिनानिमित्त) | हितगुज निधी | ५०० |
| मु. १६७५ | श्री.योगेश(मन्मथ)गोविंद मराठे,मंगळूर(पृ.५८०) | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |

* टीप:१. मागील अंकातील चुकीच्या नावाची पावती. क्र.१६६४ रद्द समजावी. क्षमस्व.
टीप २. मागील अंकातील पावती क्र. १६६५ च्या देणगीदाराचे नाव -सुनील प्रभाकर विद्वांस, कर्जत (पृ. ६५८) असे आहे.

**सूचना**: *प्रतिष्ठान कार्यालयाकडे मनी ऑर्डर करताना संदेश पट्टीवर पाठविणाराने संपूर्ण नांव व पत्ता देणे आवश्यक आहे. (जागे अभावी सही केली नाही तरी चालेल).*

शिवाय गोमंतक मराठे परिवार शाखेच्या पीर्ण येथील संमेलनाचा वृत्तान्त पृ.२२ वर पहा.

## पुणे शाखा वृत्त

मराठे प्रतिष्ठानचा २७ वा वर्धापनदिन व प्रतिष्ठान डायरी २००७ चा प्रकाशन समारंभ

मराठे प्रतिष्ठानचा २७ वा वर्धापनदिन गांधर्व महाविद्यालयाच्या नवीन वास्तूत करण्याचे ठरले. सर्वांना या कार्यक्रमाची पत्रे पाठविली होती. पत्र लिहिण्याचे काम अनेक कुलबांधवांनी अगदी व्यवस्थित आणि उत्साहाने केले असल्याने मोठ्या संख्येने कुलबांधव उपस्थित होते. हॉलमधील आसन व्यवस्था, स्पीकर व्यवस्था,पाहुण्यांच्या स्वागताची, सत्काराची तयारी, फुले,नारळ वगैरेसह नीटपणे केली होती. मराठे प्रतिष्ठानच्या वर्धापनदिना निमित्तचा बॅनर हॉलच्या प्रवेशाच्या जागेत लावला होता. हॉलच्या प्रवेशद्वारात श्री.अच्युत चक्रदेव हे येणाऱ्या सर्वांची नांवे लिहून घेण्यासाठी बसले होते. सनईची कॅसेट लावली असल्याने वातावरण आनंदी उत्साही होते. सर्वजण एकमेकांची चौकशी करीत होते. गप्पा मारीत होते.

ठीक ४.३० वा. कार्यक्रम सुरू झाला. स्टेजवर अध्यक्ष आनंद मराठे, हितगुजचे सहसंपादक सीताराम खांबेटे, डॉ. गिरीश जाखोटिया, पूर्व-संपादक ल.शं.मराठे, यांना बसण्याची विनंती सौ. नीलांबरी मराठे यांनी केली. कु. कस्तुरी मराठे हिने स्वागत व निवेदनाचे काम मोठ्या उत्साहाने व बिनचुकपणे केले. सौ. प्राची मराठे हिने ईशस्तवन सुरेल आवाजात सादर केले. २००७ च्या डायरीचे प्रकाशन अध्यक्ष श्री. आनंद मराठे यांच्या शुभहस्ते झाले.

वर्धापनदिन व डायरीचे प्रकाशन एकत्र करण्याचे ठरविल्याचे निवेदन सौ. नीलांबरी मराठे यांनी केले. यापुढे दरवर्षी २५ डिसेंबर याच दिवशी हा कार्यक्रम याच ठिकाणी-गांधर्व महाविद्यालयामध्ये घेण्याचे निश्चित झाले आहे ,असे त्यांनी जाहीर केले. डायरीतील मागील वर्षाच्या उणीवा व चुका यावर्षी दूर केल्या आहेत असे त्यांनी सांगितले व दरवर्षी डायरीसाठी हितगुजमध्ये निवेदन आल्यावर लगेच पृष्ठदान व जाहिराती देण्याचे आवाहन त्यांनी केले. मागच्या वर्षी डायरीच्या माध्यमातून रु. २५००० प्राप्त झाले. त्याचा विनियोग प्रतिष्ठानच्या वास्तुनिधीसाठी करण्याचे ठरले आहे असे त्यानी सांगितले.

श्री. आनंद मराठे यांनी मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेची घोडदौड जोरात असल्याचे सांगितले. त्याचबरोबर पुणे शाखेला प्रतिष्ठान लागेल ती मदत करील असे आश्वासन दिले. याप्रसंगी अध्यक्षांच्या हस्ते सौ.नीलांबरी मराठे यांना गौरवपत्र प्रदान करण्यात आले. श्री. खांबेटे यांनी त्याचे वाचन केले.

यापुढील हितगुजच्या सहसंपादनाचे काम श्री.सीताराम खांबेटे यानी करावयाचे ठरले असल्यामुळे हितगुजचे सतत १२ वर्षे संपादन केलेल्या श्री.ल.शं.मराठे यांचा सत्कार करण्यात आला. श्री. खांबेटे यांनी यापुढील काळातील हितगुजमध्ये उद्योजकांची माहिती, विशेष यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक, चांगले वाचनीय साहित्य, तरुणांचा अधिक सहभाग, यावर भर देण्याचा प्रयत्न असेल असे सांगितले. यासाठी संगणकाचा वापर करणाऱ्या तरुण वर्गाला बरेच सहकार्य करता येण्यासारखे आहे असे सुचविले. संपादनाची प्रमुख जबाबदारी डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०) यानी स्वीकारली असल्याचेही त्यानी यावेळी सांगितले.

चि. तत्मय अजित चक्रदेव (पृ७३७)या गुणवंत विद्यार्थ्याला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. *(पुढील मजकूर पृ. ४ वर )*

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**१. विंग कमांडर यशवंत लक्ष्मण मराठे यांचा अमृत महोत्सव**

श्री यशवंत लक्ष्मण मराठे(पृ.१०१) याना दि. ३१ जानेवारी २००७ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. मुलगा विनायक व मुलगी सौ. शुभा मिलिंद गोखले यांनी वडिलांचा अमृतमहोत्सव साजरा केला.

३५ वर्षे भारतीय वायुसेनेतील सेवेच्या कालावधीत त्यांची तब्येत उत्तम होती. नंतर स्वतःच्या व्यवसायात एकही दिवस सुट्टी न घेता ते कामात इतके मग्न झाले की प्रकृतीकडे दुर्लक्ष होऊन हार्ट अॅटॅक आला. त्यातून सावरताना जीवनशैली बदलणे अपरिहार्य आहे हे लक्षात आले.

रोज अर्धा तास हास्यसंघात हजेरी, वर्षातून एकदा (मे-सप्टेंबरात) हिमालयात ८-१० दिवसांचे ट्रेकिंग, डिसेंबरमध्ये पुणे सायकल प्रतिष्ठान सदस्यांबरोबर ७०० ते १००० कि.मी. सायकल रॅली, ज्येष्ठ नागरिक संघात जबाबदारीचं काम, एका इंग्लिश हायस्कूलमध्ये मॅनेजमेंट कमिटीवर, पुणे इंग्लिश लिटरेचर क्लबचे सदस्य, निवृत्त वायुसेना अधिकारी क्लब, वगैरेत पूर्ण व्यग्र असतात.

त्यांचे साधारणतः १५० ते २०० व्यक्तींच्या मित्रपरिवाराशी सलोख्याचे संबंध आहेत. यातले अर्धे विश्रांतवाडीतले तर बाकीचे पुण्यातले. पंचाहत्तरीचा सोहोळा जवळच्या ज्येष्ठ नागरिक संघात व दूरच्या स्नेह्यांसाठी निवृत्त ऑफिसर्स क्लब (राजेंद्रसिंहजी इंस्टिट्यूट) येथे झाला. दोन्ही ठिकाणी गायन, ग्रुप फोटो, प्रिति भोजन व मनोगत हा कार्यक्रम अगदी आनंदी वातावरणात पार पडला. कार्यक्रमास प्रतिष्ठानतर्फे श्री रमेश रामचंद्र मराठे (पृ.२८०) उपस्थित होते.

यापुढेही समाजाभिमुखता जोपासता यावी ही इच्छा उत्सवमूर्ती श्री. यशवंत यांनी व्यक्त केली.

(प्रेषक- सौ. सुनीती यशवंत मराठे, पुणे.)

**२.एयरबस ३२०चा विक्रमी मराठी वैमानिक -अतुल प्रकाश चक्रदेव(पृ.६२४)**

एयरबस ३२० हे विमान चालविणे हे प्रत्येक वैमानिकाचे उराशी बाळगलेले स्वप्न असते. ठाण्याच्या अतुल चक्रदेवने नुकताच हा मान मिळविला. एयरबस ३२० उडविणारा अतुल हा जगातला दुसरा किंवा तिसरा मराठी वैमानिक असावा. प्रथम ठाण्याच्या ए. के. जोशी या इंग्लिश माध्यमाच्या हायस्कूल मधून व नंतर मुलुंडच्या वाणी विद्यालयात बारावीपर्यंत इलेक्ट्रॉनिक्स व रामराव आदिकमधून त्याच विषयात इंजियिरिंगची पदवी घेऊन अतुलने अमेरिकेला प्रयाण केले ते तेथून पायलट लायसेन्स मिळवून भारतात परतण्यासाठीच. एकदोन वर्षे फ्लाईट सेफ्टी या विभागात काम केल्यावर तो पुन्हा अमेरिकेला गेला व फ्लाईट इन्स्ट्रक्टर हा अभ्यासक्रम मिशिगनमध्ये पूर्ण करून तेथे त्याने बऱ्याच वैमानिकाना प्रशिक्षण दिले.

९/११ च्या भयंकर घटनेनंतर त्याने जगप्रसिद्ध एब्रीरिडल युनिव्हर्सिटीमधून मास्टर इन एयरोनॉटिकल सायन्स ही पदवी घेतली. त्यानंतर एयर ऑपरेशन इंक या अमेरिकन कंपनीमध्ये बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर म्हणून काम केले. या विस्तृत अनुभवामुळे प्रथम त्याला एयरबस ३२०वर को-पायलटच्या सीटवर बसावयास मिळाले व त्याच्या मेहनतीचे सार्थक झाले. दरम्यान त्याने टॉमहोक हे विमान उडवले व फ्लॉरिडा ते न्यूयॉर्क हे सर्वात लांब पल्ल्याचे उड्डाणही केले. अशा प्रकारे विमानोड्डाणातील उच्च शिखरे गाठणाऱ्या अतुल चक्रदेव या मराठे कुलबांधवांची उत्तरोत्तर प्रगती होवो ही सदिच्छा.

**३.श्रीमती कुमुद डोके (वै.वामन आत्माराम-पृ.३६६यांची मुलगी) यांचे नेहरू सेंटर वरळी, येथे चित्रप्रदर्शन**

दि. १३ ते २१ जानेवारी या काळात भरलेल्या या प्रदर्शनात केवळ एकाच थीमची निवड न करता विविध विषयांवरील रेखाटने, चित्रे यांचा समावेश होता हे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. श्रीगणेश चित्रे, डिनर सेट, कपबशा, टीसेट, स्त्रियांची नक्षीदार आभूषणे, गालिचा, दागिन्यांची पेटी, आरसे, वेणीफणी पेटी, इ. अनेक चित्रांचा समावेश होता.

काही चित्रे कुमुदताईंनी प्रत्यक्ष त्या स्थळी जाऊन काढली आहेत त्यामुळे ती ज्यास्त सजीव, जिवंत वाटतात. उदाहरणार्थ, हरिद्वार, गंगाघाट, उंच टेकडीवरचे देऊळ, दत्ताचे मंदीर, कोकणातील घरे, इ. या सर्व चित्रांमध्ये रंगसंगतीचा मेळ कलात्मकतेने साधला गेला आहे.

त्यांच्या चित्रामध्ये गूढगम्य असे काही नसते. साधे, सरळ, सोपे, असे ते चित्र असते. पाहता क्षणी ते मनाला भावते. कलेचा हा वारसा त्यांच्या मुलांमध्येही उतरला आहे. ज्या विद्यार्थ्यांना कुमुदताईंचे मार्गदर्शन लाभले आहे अशा डोंबिवलीच्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिरच्या काही विद्यार्थ्यांचीही चित्रे येथे मांडली होती.

पूर्वी हितगुजच्या मुखपृष्ठाचे रेखाटनही त्यांनी केलेले जुन्या सदस्यांना आठवत असेल. अशा या गुणी कलाकाराचे हार्दिक अभिनंदन.

(प्रेषकः डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे, संपादिका)

**४.वसई-पारनाका येथे अरुण मोरेश्वर मराठे (पृ. १९०)यांची आर्ट गॅलरी**

अनेक सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळींचे आगर असलेल्या वसईत आर्ट गॅलरीची उणीव होती. ती श्री. अरूण मराठे या आपल्या सदस्याने "मराठे आर्ट गॅलरी " सुरू करून भरून काढली आहे याबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन.

श्री अरूण मराठे हे दादर येथील मॉडेल आर्ट इंस्टीट्यूटचे माजी प्राचार्य आहेत. या पदावर ३० वर्षे काम करून नुकतेच निवृत्त झालेल्या मराठे सरांच्या कलाकृतींची प्रदर्शने मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत दोनदा तर बजाज आणि नेहरू या दोन्ही गॅलऱ्यांमध्ये प्रत्येकी तीनदा भरलेली आहेत.

वसई तालुक्यात चित्रकार, शिल्पकार, छायाचित्रकार, मोठ्या प्रमाणावर राहतात. त्यातील अनेक जण आपली चित्रे मुंबईच्या गॅलरीमध्ये ठेवतात. पण तेथील न परवडणारी भाडी, चित्रे वगैरे नेण्या आणण्याच्या गैरसोयी यामुळे कित्येक जण नाउमेद होतात. या गॅलरीचा आता ते लाभ घेऊ शकतात. या गॅलरीची सुरुवात मराठे यांच्या लँडस्केप व सीस्केप चित्रकृतींच्या प्रदर्शनाने झाली. त्याला रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

अरुण मराठे सरांचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांना मराठे प्रतिष्ठानच्या शुभेच्छा.

-०००-

## व्रतबंध सोहळा

चि. परशुराम (उर्फ) सुमित सौ. स्नेहा व श्री. संदीप परशुराम मराठे (पृ.५२१)यांचा सुपुत्र ह्याचा व्रतबंध संस्कार रविवार दि.४ फेब्रुवारी २००७ रोजी त्यांच्या निवासस्थानी, बिंबल-सत्तरी, गोवा (जेथे मराठे प्रतिष्ठानचे ८ वे अखिल भारतीय संमेलन भरले होते) येथे थाटामाटात संपन्न झाला. मराठे प्रतिष्ठानतर्फे बटू चि. अमित यास अनेकोत्तम शुभाशीर्वाद. त्याने परमपवित्र यज्ञोपवीत धारणाने ज्ञानसंपन्न व बलसंपन्न होऊन आपल्या कुळाचा व राष्ट्राचा उद्धार करावा , व नांवलौकिक वाढवावा हीच शुभेच्छा.

-०००-

## नांदा सौख्यभरे

**१.** पुण्याचे श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे (पृ.३८९) यांचा सुपुत्र **चि.अनिरुद्ध** (अमोल) याचा विवाह शुक्रवार दि.**१५-१२-२००६** रोजी श्री. रामानुजम् रघुनाथ आचार्य यांची कन्या चि.**गायत्री** हिजबरोबर पुणे येथे पार पडला.

**२.** पुण्याचे श्री. रघुनाथ गोविंद मराठे (पृ.१९९) यांची कन्या **चि.अश्विनी** हिचा विवाह रविवार दि.**२४-१२-२००६** रोजी श्री. सुभाष दुनाखे यांचा सुपुत्र **चि.चित्तरंजन** यांचेबरोबर पुणे येथे थाटात पार पडला.***(पुढील मजकूर पृ.२३वर)***

# मुक्काम पोस्ट-परांजपे नगर, बोरिवली(प)

जयंत श्रीधर विद्वांस (पृ.६४८)३ ए,योगानंद सोसायटी,बोरिवली (प). दूरध्वनी -२८३३७०८१

*(स्व.बाबूराव परांजपे यांनी मध्यमवर्गीयांसाठी परवडण्यासारख्या छोटेखानी घरबांधणी योजनेचा आदर्श घालून गेल्या शतकाच्या उत्तरार्धात मुख्य मुंबईतून विलेपार्ले, अंधेरी, बोरिवलीसारख्या उपनगरात हजारो चाळकऱ्यांचे पुनर्वसन करून फार महान कार्य केले याबद्दल त्यांना आजही देवाइतका मान देणाऱ्या ज्येष्ठांचे प्रातिनिधिक मनोगत जयंतरावांच्या या लेखात व्यक्त झाले आहे. -संपादक)*

"अरे मुलांसाठी शाळा जवळ, मोठ्यांसाठी ऑफिस जवळ, दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या वस्तू मिळणारी दुकाने सुध्दा जवळ अशी ठाकूरद्वारसारखी जागा सोडून बोरिवली सारख्या दूर ठिकाणी आणि तेसुध्दा स्टेशन पासून दूर परांजपेनगर येथे रहाण्यास जाण्याचा अविचार करू नकोस." माझा परांजपेनगर बोरिवली येथे रहाण्यास जाण्याचा निश्चय पाहून आमच्या एका ज्येष्ठ नातलगाने मला सुनावले. परंतू माझा बोरिवली येथे रहाण्यास जाण्याचा निश्चय अभेद्य होता.

ते १९६५ हे वर्ष होते. त्यावेळी बोरिवली हे जणू छोटेसे गावच होते. बोरिवलीचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग होते. पूर्वेला गुजराथी लोकांची वस्ती होती. स्टेशन जवळ व दत्तपाडा येथे बैठ्या जुन्या चाळी होत्या. टोकाला संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, लगतच श्रीकृष्ण नगर व अभिनव नगर अशी नगरे होती. अभिनव नगर येथे बंगला संस्कृती उदयाला येऊ पहात होती.

पश्चिमेला स्टेशन जवळ जुन्या चाळी होत्या व तेथे गुर्जर बांधवांची वस्ती होती. बाभई येथे वाड्या होत्या व तेथे परंपरागत जुन्या पध्दतीची घरे होती व पुढे संपूर्ण परिसर निर्मनुष्य होता व तेथे रात्री जाण्यासाठी कुणीही धजावत नसे.

अशा ठिकाणी ठाकूरद्वार येथील बेस्ट सिल्व्हर कंपनी या सुप्रसिध्द पेढीचे मालक व घरबांधणी तज्ञ श्री बाबूराव परांजपे यांनी कनिष्ठ मध्यम वर्गीय नोकरदारांना चाळ संस्कृती सोडून, थोडे कर्ज काढून स्वतःच्या स्वतंत्र घरात रहाण्याचा निर्विवाद आनंद उपभोगण्यास मिळावा या उद्देशाने बोरिवली (प.) वझिरा नाका येथे पुष्कळ बिगर शेती जमीन विकत घेतली व त्या ठिकाणी सहकारी सहनिवास स्थापन करण्याचे ठरविले. बाबूराव व्यवहाराला मोठे चोख व कर्तव्यदक्ष होते. ते शब्द दिल्याप्रमाणे वेळच्या वेळी इमारत उभी करून दाखवत असत. बोरिवलीला आणि ते सुद्धा स्थानकापासून दूर कोण रहाणार ? या यक्ष प्रश्नाने लोक प्रथम धास्तावलेले असत. परंतू नंतर १५-२० लोक एकत्र जमले व त्यांनी वझिरानाका बसथांब्या जवळ असलेल्या जागेवर सहकारी सोसायटी स्थापून रहाण्यास सुरवात केली. तीच चाळवजा जुनी कर्मयोग सहकारी गृहनिर्माण संस्था. त्यांचा उत्साह पाहून कै. बाबूराव परांजपे यांनी तेथून थोडे आत शिरल्यानंतर डाव्या बाजूला आणखी जादा ऐसपैस जागा असलेली ज्ञानयोग सहकारी संस्था स्थापन केली. त्यानंतर क्रमाक्रमाने भक्तियोग, राजयोग, योगानंद या सहकारी गृहनिर्माण संस्थांची स्थापना झाली. नंतर राजयोग सहनिवासाने (रिझर्व बँक कर्मचारी सोसायटी ) महानगरपालिकेचा कर वाचवण्याच्या दृष्टीकोनातून नवीन दीपराज सोसायटीस जागा दिली. परंतू त्यामुळे श्री बापट यांच्या सुप्रसिध्द बंगल्याची शान निघून गेली. यात काय संशय? ते वर्ष होते १९९८-९९. नंतर आजूबाजूला क्रमाक्रमाने नवी कर्मयोग सोसायटी, रोझ व्ह्यू सोसायटी, मेघालय सोसायटी व गाई म्हशींचे तबेले इतिहासजमा होऊन झालेली सनराईझ सोसायटी अशा सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पीक आले. परांजपे नगरातील वैशिष्ट्यपूर्ण ब्राह्मणी संस्कृती लोप पावून विविध भाषी संस्कृती तयार झाली.

परांजपे नगराच्या बाजूला अशोक नगर, जयराज नगर वगैरे नगरे १९९५ च्या आसपास जन्मास आली. योगानंद, भक्तियोग, ज्ञानयोग वगैरे सोसायट्या, एखादा चाकरमानी सेवानिवृत्त होऊन म्हातारा दिसू लागतो, तशा दिसू लागल्या. स्व. बाबूराव परांजपे यांनी दूरदर्शीपणाने नवीन जन्मास आलेल्या उगवत्या पिढीला शिक्षणासाठी बाहेर दूर जाण्यास लागू नये म्हणून जवळच सुविद्यालयाची स्थापना केली. त्याचबरोबर किराणा मालासाठी दूर जाण्यास लागू नये म्हणून ज्ञानयोग सोसायटीतील दोन गाळ्यांमधे गिरगावातील सुप्रसिध्द किराणा मालाचे दुकानदार श्री. जोशी बंधू यांच्या दुकानास परवानगी दिली. त्यांच्या शेजारीच श्री. दाते यांचे पोळी भाजी केंद्र चालू करण्यास परवानगी दिली. त्यामुळे परांजपे नगर म्हणजे सुविद्यालय, जोशी बंधू यांचे दुकान व श्री. दाते यांचे पोळी भाजी केंद्र हे समीकरण रूढ झाले. आज परांजपेनगर मध्ये जीवनावश्यक सर्व वस्तू मिळतात.

स्व.बाबूराव परांजपे यांनी कनिष्ठ मध्यम वर्गीयांना स्वतःच्या घरी स्वतंत्रपणे व निवांतपणे रहावे हा मंत्र नुसता शिकविला नाही तर आचरणात कसा आणावा याची दीक्षा दिली हे निर्विवाद सत्य नव्हे काय?

मी परांजपेनगरात बोरिवली (प.) येथे १९७२ सालापासून रहातो. यापुढेही परांजपे नगरातच रहाणार आहे. मी परांजपे नगरवासी आहे याचा मला सार्थ अभिमान वाटतो. भले लोक " गीतेतील कोणत्या योगाच्या चाळीत रहातोस? "असे हिणवोत. मला त्याची पर्वा नाही.

-०००-

***(प्रतिष्ठानवृत्त-पुणे शाखावृत्त पृ.२ वरून)***

त्यांतर डॉ. गिरीश जाखोटिया यांची श्री. गजानन मराठे व श्री.विनायक लिमये यांनी संयुक्तपणे मुलाखत घेतली. उद्योजकाला आवश्यक असणाऱ्या गुणांचे छान विवेचन डॉ. जाखोटिया यांनी केले. उद्योग-व्यवसायात चिकाटी लागते, ग्राहकाचा पिच्छा पुरविणे हा मार्केटिंगचाच भाग असता, उद्योगात पुढे जायचे असेल तर एक नावडता प्रकार-वाकेन पण तुटणार नाही-अंगिकारावा लागतो, असे त्यांच्या विवेचनाचे प्रमुख मुद्दे होते. ते म्हणतात, चलाखी म्हणजे चतुराई आणि लबाडी यांचे सुरेख मिश्रण! इतरांना सलाम करीत धिरुभाई अंबानी या अचाट माणसाने सारे जग आपल्या संपत्तीसमोर नमवीत असतानाच ग्राहकाला देव मानण्याचे महत्त्व कसे ओळखले होते हे उदाहरण सांगितले. या संदर्भात सर्व सामा्य नेता होण्यासाठी प्रखर बुद्धिमत्तेपेक्षा परिश्रमाने अंगी बाणविलेली चलाखी असावी लागते. श्रीकृष्णाची चतुराई च शिवाजीचा गनिमी कावा याचीच उदाहरणे आहेतअसे पटवून देत डॉ जाखोटियांनी मुलाखत रंगतदारपणे संपविली.

श्री.माधव मराठे यांनी हस्ताक्षर स्पर्धे विषयीचे निवेदन केले. या स्पर्धेचा निकाल पुढील हितगुजमध्ये प्रसिद्ध होईल असे सांगितले ( हा निकाल याच अंकात पृ.९ वर पहा- संपादक).

यानंतर मराठ्यांची माहेरवाशीण सौ. वर्षा गोडबोले यांच्या सहकार्याने संगीताचा कार्यक्रम झाला. मधुरा मराठे व परिणीता नवसकर यांचे गायन, स्नेहा बेलसरे यांच्या हार्मोनियम व विराज बिवलकर चा तबला अशा सुदर साथीने चांगलेच रंगले.सौ. माटे यांच्या ग्रुपने ही सुश्राव्य गाणी सादर केली. तनया मराठे हिने भरतनृत्याची चुणुक दाखविली.

सर्व कलाकारांचे आभार मानून व गुलाबपुष्पे व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला व अल्पोपहाराचा आस्वाद घेत या कार्यक्रमाची सांगता झाली. अशा रितीने मराठे प्रतिष्ठानचा वर्धापन दिन व २००७ डायरी प्रकाशन समारंभ मोठ्या उत्साहात व आनंदात पार पडला.

सौ. निर्मला प्रभाकर मराठे,पुणे

### महत्त्वाची सूचना (१)

*ई-मेलची सोय असलेल्या वाचक-सदस्यानी आपल्या पूर्ण नाव-पत्ता-फोन सह या अंकाची पोहोच द्यावी. तसेच आपल्या परिवारातील सर्व सदस्यांच्या जन्मतारखा व नोकरी-शिक्षणानिमित्त अन्यत्र राहणाऱ्या परिवार सदस्यांचे ई-मेल व फोन नंबर पत्यासह कळविल्यास त्यांना हा व यापूर्वीचा ( डिसेंबर २००६चा) अंक पीडीएफ फाईलमध्ये पाठविण्यात येईल.-संपादक*

1. maratheparivar@yahoo.co.in OR
2. sitaram_khambete@yahoo.com )

***(दुसरी सूचना पृ. २४ वर)***

# टेन्शन फ्री गंपू

गजानन भास्कर मराठे (पृ.४२७) घाटकोपर.
(दूरध्वनी - २५१६३९०७ )

*(हितगुजच्या वाचकाना सुपरिचित असलेले 'हसरे हितगुज' फेम व 'बेस्टायन' या अनुभवकथनपर कार्यक्रमाचे सादरकर्ते ग.भा.' यांचे हे मानवी जीवनातील बारकाव्यांचे सूक्ष्म निरीक्षण अनेकाना पुनः प्रत्ययाचा आनंद देऊ शकेल.-संपादक)*

१९४७ साली मॅट्रिक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या आमच्या बॅचच्या मुलांचे अलिकडेच संमेलन झाले. सुमारे १०० विद्यार्थ्यांपैकी ६० जण हजर होते. प्रत्येकाने आपला जीवनपट उलगडला व त्यातून सर्वात सुखी असणाऱ्या सहकाऱ्याचा आम्ही सत्कार केला. त्याचा मानकरी ठरला गंपू गोखले.

त्याने शिक्षण झाल्यावर इतर नोकऱ्या न स्वीकारता मुंबई पोर्ट ट्रस्टमधे कारकुनाची नोकरी स्वीकारली. कारण मुंबई बाहेर बदलीचा प्रश्न येऊ नये. त्याचे वडील रेव्हेन्यू खात्यात असल्यामुळे शिक्षणाच्या अकरा वर्षात त्याच्या सात शाळा झाल्या होत्या. त्याचे मातृपितृ छत्र मात्र तो कॉलेजमधे असताना हरपले. त्याला भावंडे पण नव्हती. पण त्यातून तो सावरला.

त्याने आपली शेती विकून गिरगांवात प्रशस्त गॅलऱ्या व जिने असणाऱ्या, एका भक्कम चाळीत कडेची जागा घेतली व त्यामुळे त्याला तिसरी खोली पण पार्टीशन टाकून मिळाली. शिवाय त्याने दूरदृष्टीने पहिला मजला निवडला.

लग्नाच्या वेळी त्याची अट मुलगी दिसायला बेताची असली तरी म्युनिसिपालटीत शिक्षिका पाहिजे अशी होती. मुंबई म्युनिसिपल शाळेत पगार पुरेसा व वेळेवर मिळतो. शाळा शक्यतो घराच्या जवळ देतात.प्रायव्हेट शाळांमध्ये शिक्षकांना मॅनेजमेंटकडून त्रास होतो. पालक तक्रारखोर असतात. पगार वेळेवर मिळत नाहीत इत्यादि. म्युनिसिपालटीत जॉर्ज फर्नांडिसची युनियन असल्यामुळे सर्व कामगार, शिक्षक, कारकून, सफाई कामगार यांचे पगार वाढतच असतात. शिवाय दर तीन वर्षांनी ॲवार्ड येतेच. ऑफिसमधील नोकरीपेक्षा शाळेतील शिक्षकाची नोकरी जास्त सुखाची आणि मुख्य म्हणजे शिक्षकांची मुले बव्हंशी हुशार निघतात, खूप पुढे येतात कारण त्यांच्यावर चांगले संस्कार होतात.

गंपूने बढतीकरिता कधी पयत्न केले नाहीत. रिटायर होता होता त्याला काही महिने सिनियारिटी प्रमाणे हेडक्लार्क म्हणून बढती मिळाली होती . त्याला संगीत, नाटक, वाचन, क्रिकेट याची मनस्वी आवड होती. तो संध्याकाळी सहाला पत्नीच्या हातचा चहा घेण्यास हजर असे. सकाळी मरीन ड्राईव्हवर एक तास फिरत असे. त्यामुळे तब्येत ठणठणीत. शिवाय कारकून असल्यामुळे कामाचे टेन्शन नाही. कॅज्युअल लीव्ह, सिक लीव्ह, प्रिव्हिलेज लीव्ह, बँक हॉलिडे, श्रावण सोमवार, ग्रहण यांची अर्धा दिवस सुट्टी याचा नियोजन पूर्वक फायदा घेऊन तो ट्रिपा काढणे,नाटक- सिनेमा पहाणे, विविध भाषणे ऐकणे या गोष्टी रसिकतेने करीत असे. दोघांच्या पगारात या फार खर्च नसणाऱ्या चैनी भागत असत. त्यामुळे तो सदैव उल्हासी व आनंदी असे. तो गंमतीने म्हणायचा की गुड फ्रायडे मला आवडतो कारण तो फ्रायडेलाच येतो. इतर सणांच्या सुट्या अधूनमधून रविवारी येतात व त्यामुळे बुडतात.

त्याला दोन मुलीच झाल्या व तिथेच तो थांबला. त्या (शिक्षिकेच्या मुली असल्यामुळे) हुशार होत्या. स्कॉलरशिप, बक्षिसे पटकावीत खूप शिकल्या. एक सी.ए. झाली, तर दुसरी अर्थशास्त्राची प्राध्यापक झाली. कन्यारत्नेच असल्यामुळे घरोघरी आढळणारे दोन पिढ्यातील विसंवाद - मुलगा, सून असल्यावर जे दिसतात ते त्याच्या वाट्याला आले नाहीत. शिवाय मुलगा नसल्यामुळे मोठी जागा घेण्याचा प्रश्नच आला नाही. चाळीत रहात असल्यामुळे म्हातारपणी चोऱ्यामाऱ्यांचा, एकटेपणाचा त्रास जाणवत नाही. शिवाय आता टॉयलेट पण घरात करण्याची म्युनिसिपालटीने परवानगी दिल्यामुळे तोही त्रास नाही. कार, टी.व्ही.पासून कपडे, भाजीपाला इत्यादि सर्व खरेदी दहा मिनिटांमधे चालण्याच्या परिसरात. पहिला मजला असल्यामुळे म्हातारपणी जिने चढण्याचा त्रास नाही. आजारपणात, अडचणीत मुली प्रेमाने धाऊन येतात, मदत करतात. गंपू गंमतीने म्हणतो की मुलीच्या सासरच्या लोकांना नावे ठेवायची, हाही एक छान विरंगुळा असतो. नातवंडे गंपू व त्याची पत्नी आनंदाने सांभाळतात.

एक मुलगी परदेशी गेली कारण तिचा नवरा पाच वर्षाकरिता कंपनीतर्फे एका प्रोजेक्टकरिता गेला होता. तिने आई-वडिलांना युरोप, अमेरिका दाखवून आणले. दुसऱ्या लेकीने त्यांना रिटायर झाल्यावर सबंध भारत फिरवून आणले.

अशा रीतीने गंपू सगळ्यांत जास्त टेन्शन फ्री होता. बाकीचे काही सरकारी, मोठ्या पदावर होते, राजकाणात, धंद्यात होते. पण सर्वांना काही ना काही टेन्शन होते. ब्लडप्रेशर, डायबेटिस, हार्टट्रबल, बायपास यांनी काही त्रस्त होते. कोणाची मुले परदेशात असल्यामुळे मोठ्या जागेत एकाकीपणाचे आयुष्य काढीत होत. काही सूनवासाने पीडित होते. काहींना मोठ्या पदावरून रिटायर झाल्यावर, कोणी विचारत नाही, याची खंत होती. असे नाना प्रकार.

**गंपूच्या सुख-समाधानाचे रहस्य त्याच्या साधेपणात, मोठेपणाचा हव्यास न धरण्यात, आपले छंद (फार खर्चिक नसलेले) जोपासण्यात व विचारपूर्वक नियोजनात होते. त्याला समाधानी, गृहकृत्यदक्ष, फार हव्यास न धरणाऱ्या पत्नीची साथसंगत मिळाली. ते मेड फॉर ईच अदर आहेत.**

या सर्व गोष्टींमुळे तो अम्हां सर्वात जास्त सुखी म्हणून निवडला गेला व सत्कार मूर्ती झाला. गंपू व त्याची पत्नी धडधाकट राहून शंभरी गाठू शकतील अशी आम्हा सर्वांची खात्री आहे. सर्वांच्या शुभेच्छा त्याच्या मागे आहेत.

-०००-


**मराठे प्रतिष्ठानच्या सदस्यांना**

***जाहीर आवाहन***

**महाराष्ट्र चित्पावन संघ, पुणे**
**अमृतमहोत्सवानिमित्त**
आयोजित
**सर्व चित्पावन कुलांचे पहिले जागतिक चित्पावन महासम्मेलन**

***रविवार दि. २३ डिसेंबर २००७***

***स्थळ: चंद्रशेखर आगाशे कॉलेज, मुकुंदनगर, पुणे***

अधिक माहिती आणि नोदणीसाठी
संपर्क:

महाराष्ट चित्पावन संघ, पुणे
१२०८, सदाशिव पेठ, टिळकरोड,
लिमये वाडीजवळ,पुणे ४११०३०
फोनः(०२०) ३२५४१२४०/९८८१७२४३७५/ ९३२३६९३२६६
fax:(020) 24475836
**e-mail:info@chitpavans.in**
**website:www.chitpavas.in**
**-000-**

*(मराठे प्रतिष्ठान च्या पुणे सदस्यानी सौ.नीलांबरी मराठे, संचालिका- व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र , ६४३,आप्पा बळवंत चौक, प्राथमिक नू.म.वि. शाळेसमोर,. पुणे ४११०३० किंवा फोनः २४४५६२७० येथे अधिक तपशीलासाठी व माहितीपत्रकासाठी संपर्क साधावा)*

# पुनर्भेट!

-विनायक केशव मराठे (पृ.२०)
वरळी, मुंबई ४०००२५ दूरध्वनी-२४३०३३२९

*(प्रतिष्ठानचे अध्वर्यू व्हीके यांच्या कथांमध्ये व्यक्तिचित्रण, मनुष्यस्वभावदर्शन व कोकणच्या पार्श्वभूमीचे तपशीलवार वर्णन समर्थपणे केलेले आढळते याचा हितगुजच्या वाचकांना परिचय आहेच. त्यापैकीच ही एक वाचकमनाला चटका लावून जाणारी कथा- संपादक)*

उन्हाळ्याचे दिवस होते. मुलांच्या शाळांना सुट्या सुरू झाल्या होत्या. कोल्हापूरच्या अंबाबाईचा नवस सौ.ला फेडायचा होता. सांगलीला सौ.च्या मामानी मला आग्रहाचं निमंत्रण केव्हाच देऊन ठेवलं होतं. बऱ्याच वर्षांनी कोंकणात जाण्याची संधी आली होती. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कधी नव्हे तो महापालिकेने बोनस दिला होता. ती रक्कम सौ.ने कडीकुलपात घालून ठेवली होती. तेंव्हा मुंबई-सांगली-कोल्हापूर-कोंकण असा कार्यक्रम नक्की झाला.

आपला बेत गुप्त ठेवून शेजाऱ्यांना, नातेवाईकांना चाट करण्याच्या शपथा सगळ्यांनी सौ.समोर घेतल्या. पण प्रवासाच्या आदल्या दिवशी अंबाबाईस अभिषेक करण्यासाठी दहा जणांच्या चिठ्ठ्या, कोंकणातून आंब्याचे करंडे आणण्याच्या १५-२० जणांच्या मागण्या या प्रकाराने आम्हीच चाट पडलो. त्यात भर म्हणून आमची खोली महिनाभर रिकामी राहणार म्हणून नुकत्याच लग्न झालेल्या चिरंजीवाना ती सोइस्कर पडेल या हिशेबाने शेजारच्या बंडोपंतानी चाव्यांचा दुसरा जुडगा आठ दिवसापूर्वीच पळवला होता. सर्व दोर तुटले होते तेंव्हा कोंकणावर स्वारी करणं भागच होतं!

मुंबईहून संध्याकाळी सुटणाऱ्या महालक्ष्मी एक्सप्रेसची तिकिटं रिझर्व करून आम्ही निश्चिंत झालो.

गाडी वेळेवर सुटली. कोंकणाविषयी मुलांच्या आडव्या तिडव्या प्रश्नांना उत्तरं देतांना मी अगदी हैराण झालो होतो. सौ.च्या कडक पहाऱ्यामुळे सिगरेट ओढता येत नव्हती. चार लोकात वाईट दिसेल म्हणून अंगातला कोट काढायला सुद्धा सौ. परवानगी देत नव्हती. शेजारच्या कंपार्टमेंटमध्ये दोन चार चांगले पॅसेंजर- म्हणजे गप्पा मारायला- हेरले होते. सौ.ला सुचवून पाहिलं. पण कसचं काय! “ वेळ न जायला काय झालं? हे घ्या.” म्हणत सौ.ने पिशवीतून शनिमाहात्म्याची पोथी काढली.आणि माझ्या हातात दिली. “मला काही या धबडग्यात शनिवारी वेळ मिळणार नाही. तेंव्हा या खेपेला माझ्या ऐवजी तुम्हीच आता वाचा.” आता बोला, साडेसाती हिच्या राशीला आणि शनिमाहात्म्य माझ्या राशीला! माझा कडवट चेहरा पाहून ती वर म्हणते कशी. “एव्हढं फुगायला नको हो. आम्ही बायका नाही तुमच्यासाठी वडपौर्णिमेला उपास करत?” पोथी डोळ्यासमोर ठेवून अंदाजाने दोनदोन मिनिटांनी मी एकएक पान उलटत होतो. सिगरेटची ओढ अनावर होती. मी खिसा चाचपून पाहिला. पाकीट खिशात होतं. संडासला जाण्याचं निमित्त काढून संडासात गेलो. पण कसचं काय? खिशात फक्त पाकीट होतं. काडेपेटी चामड्याच्या बॅगेतच राहिली होती! पाकिटाचा पोटभर वास घेतला आणि परतलो.

पहाटेच्या सुमारास जाग आली. मुलं खालच्या बर्थवर झोपली होती. सौ. समोरच्या बर्थवर घोरत होती. चामड्याचं पाकीट तिच्या उशाशी होतं. खालच्या बर्थचा अंदाज घेत मी हळूच पाय खाली सोडले. खिसा चाचपला. पाकीट खिशातच होतं. मांजराच्या पावलानी चामड्याच्या पाकिटातली काडेपेटी अलगद काढली. परत माझ्या जागेवर येऊन सिगारेट पेटवून दोन चार चांगले जोराचे झुरके मारले. धुराच्या वलयात खालच्या बर्थच्या टोकाला मुलांच्या पायाशी एक वृद्ध माणूस बसल्याचं दिसलं. मी चाटच पडलो. कदाचित सिगारेटच्या आड आल्यामुळे आणि पोथीची सक्ती केल्यामुळे माझ्या मनातला राग एकवटून सौ.चं भविष्यकालीन म्हातारं रूप दिसत असेल असं वाटलं. पुन्हा एक झुरका मारला. डोळे ताणून पाहिलं. ती म्हातारी व्यक्ती पुरुष होती. झुपकेदार पांढऱ्या मिशा ..अंगात लांब कोट, गळ्यात उपरणं. डोक्यावर पगडी आणि कानांत भिकबाळी होती. असला आता अगदी आउटडेटेड असा पोषाख होता. स्वभाव पुरुषी असला तरी सौ. ही महिलाच होती. तेव्हा स्वभावावरून एवढा बदल होत नाही हे नक्की! शिवाय सौ. समोरच्या बर्थवर घोरत होती. तेंव्हा हा भास नव्हता हेही नक्की! मी त्या आजोबांजवळ काही बोलणार इतक्यात तेच म्हणाले, “ओढा खुशाल ओढा. संकोच करू नका. आता आम्हाला ती संवय नाही हे खरं ”. . त्यांचं वाक्य तोडीत मी म्हटलं, “ आजोबा, हे तुमचं कंपार्टमेंट नाही. तुम्ही जागा चुकलेले दिसता. ”

“छे! छे! आम्ही कधीच चुकत नाही. मला माहीत आहे, तुम्ही सांगलीला उतरणार, पुढे कोल्हापूरला जाणार अन् मग कोंकणात जाणार.” हा म्हातारा जादूगारच दिसतोय!

“ तुम्हाला कसं ठाऊक हो? ”

“ अहो तुम्ही सामानाच्या प्रत्येक डागावर निशाण्या मारल्या आहेत. या पहा, मुंबई-सांगली-कोल्हापूर-कोंकण. ”

मी मनात चडफडलो. ही त्या कार्ट्यांची अक्कलहुशारी. आणि त्यांच्या आईचा पाठिंबा. नशीब माझ्या कोटावर नाही ही निशाणी! कबूल करण्याखेरीज मार्गच नव्हता.

“ मग माझं एक काम कराल?”

“आता होण्यासारखं असलं तर करू.”

“ तसं काही जोखमीचं काम नाही. फक्त निरोप सांगायचा आहे. ”

“ हॅत्तिच्या! एव्हढंच ना? सांगू की. कोणाला सांगायचा आहे निरोप?” निरोप सांगण्याच्या निमित्ताने एकट्याला फेरफटका मारता येईल. एकदोन सिगारेटी ओढायला मिळतील. भडंगाची भेळ खाता येईल अशी अनेक स्वप्नं रंगवीत एकदम उत्तर ठोकून दिलं.

“ सांगतो. सांगतो. अगोदर निरोप तयार करू द्या मला. हां. तर काय म्हणत होतो मी? तुम्ही त्या गृहस्थाला माझा निरोप सांगायचा. त्याला म्हणावं, मी सांगलीला लवकरच येणार आहे. तुझी सुनबाई बुधगांवला माहेरी बाळंतपणाला गेली आहे. तेव्हा मला बुधगांवला जाणं भाग आहे. तेथून मी यथावकाश सांगलीला काय परिस्थिती आहे ते बघायला येणार आहे.” म्हाताऱ्याचा निरोप म्हणजे अमेरिकेच्या अध्यक्षांनी जगाला दिलेला संदेशच होता.

“ आजोबा, तुमच्या निरोपात सगळीच सर्वनामं आहेत. विशेषनामं नाहीतच.”

“ अरे वा, अगदी व्याकरणकार दामल्यांचे भाऊ शोभता हं. अहो, ते गृहस्थ म्हणजे माझा मुलगा दिगंबर. ह्यांची सुनबाई जानकी. आता तिचं मूल जन्माला आलं नाही, मग त्याचं नांव काय सांगणार?”

“आजोबा, तुम्ही तुमच्या मुलाचा निर्देश तो गृहस्थ म्हणून करता? ”

“अहो आता या वयात कसला मुलगा नि कसलं काय? आता आम्ही त्याच्या पलिकडे गेलो आाहोत.”

“ बरं, पत्ता काय आहे तुमच्या मुलाचा?” आजोबांनी सांगितलेला पत्ता मी माझ्या डायरीत लिहून घेतला. सहज म्हणून सौ.च्या मामाचा पत्ता सांगून ही दोन घरं कितपत जवळ आहेत ते विचारलं.

“ अहो, तो राघोपंत ना! मुन्सीपालटीत हात मारून चांगली माया केली आहे त्यानं. अन् सांगलीत अशी हवेली उठवली आहे, विचारू नका. स्टेशनातल्या कोणत्याही हमालाला विचारा, फुकट्या राघोबाचं घर कुठे आहे? तो बरोबर आणून सोडेल राघोबाच्या घरासमोर. पण हमाली मात्र अगोदर द्यावी लागेल हो!” आपल्या मामाची कीर्ती ऐकायला सौ. जागी नव्हती हे आमचं नशिब!

सांगली स्टेशनवर उतरल्यावर मी काही राघोपंतांची चौकशी केली नाही. समोर मुजुमदारांचं

लॉजिंग बोर्डिंग होतं. मी काउंटरवरच्या माणसाला सौ.च्या मामांचा पत्ता दाखवला. त्यांनी रस्ता समजाऊन सांगितला. तेवढ्यांत आजोबांची आठवण झाली. त्यांच्या मुलाचा-दिगंबरचा पत्ता डायरीतून काढून दाखवला.

"हे गृहस्थ, दिगंबर माझ्या ओळखीचे आहेत. विशेष म्हणजे यांच्या घराजवळ दोन नारळाची झाडे आहेत. या भागात नारळ होत नाहीत. म्हणून त्यांच्या घराला नारळाचा बंगला म्हणतात. तुम्ही विचारलेलं आधीचं दुसरं घर तिथून अगदी दोन मिनिटांवर आहे. मी तांगा बघून देतो. ओळख नसताना एक मराठी माणूस इतक्या मऊ भाषेत बोलताना ऐकून मी खरंच सुखावलो.

तांगा दिगंबरांच्या घराजवळ थांबला. दिगंबर झाडावरची फुलं काढीत होते. त्यांच्या पत्नी दारापुढचा भाग सारवून रांगोळी घालत होत्या. अनाहूत पाहुणा पाहून ते गांगरलेच. माझीही पंचाईत झाली. कारण नातं गोतं नाही. त्यांच्याशी प्रत्यक्ष ओळख नाही. बोलणं सुरू कसं करणार? दिगंबर बायकोला खुणा करून तिचे कोणी नातेवाईक आहेत का? विचारत होते. शेवटी मीच सुरुवात केली.

"दिगंबरपंत, मी तुमच्यापैकी कोणाचाच नातेवाईक नाही. आम्हाला राघोपंतांकडे जायचे आहे. मंडळी तांग्यातच आहेत. मी केवळ निरोप देण्यासाठी आत शिरलो."

"अस्सं अस्सं. काही हरकत नाही. मंडळींना बोलावून घ्या आंत. राघोपंतांचं घर अगदी जवळ आहे. तुम्ही सहज चालत जाऊ शकाल. आणि सामानाची काळजी करू नका. आमचा गडी तुमचं सामान घेईल."

" तो प्रश्न नाही. पण.. " मी तांग्यात बसलेल्या सौ.कडे पाहिलं. ती जोरजोरानी परत बोलावीत होती. दिगंबरांची पत्नी तांग्याजवळ गेली आणि आमची पत्नी पायउतार झाली. दिगंबरांची पत्नी सौ.ना घेऊन आत गेली. दिवाणखान्यात आम्ही बसलो.

"हं. निरोप कुणाचा?"

"खरं म्हणजे आम्ही कोकणात जायला निघालो आहोत. वाटेत सांगलीला आमचे नातेवाइकांकडे आणि कोल्हापूरला अंबाबाईचं दर्शन घेऊन आम्ही घाट उतरून कोंकणात जाणार आहोत. गाडीमध्ये आपले वडील भेटले. त्यानी तुम्हाला निरोप देण्याची विनंती केली म्हणून आत डोकावलो."

दिगंबर चांगलेच दचकले.

"तुम्हाला नक्की हाच पत्ता दिला त्या गृहस्थानी?"

"अर्थात्. मला काय ठाऊक तुमचा पत्ता? त्या गृहस्थानी तुमचा पत्ता सांगितला." मी खिशांतून डायरी काढीत तो पत्ता दाखवला.

"हे गृहस्थ म्हणाले मी त्यांचा मुलगा आहे म्हणून?"

"नाही तर मला आपल्याकडे यायचं कारणच काय? सांगलीला उतरायलाआमचे नातेवाईक आहेत. लॉजिंग बोर्डिंग आहेत. उगीच या फंदात पडलो!"

"रागावूं नका हो. पण ते कसं शक्य आहे?"

"कां नाही? तुम्हाला वडील नाहीत? ते गाडीतून येणे शक्य नाही? ते मिरजेला उतरले. सांगतो. त्यांच्या पांढऱ्या भरघोस मिशा होत्या. अंगात लांब कोट होता. उपरणं होतं. डोक्यावर पगडी होती. आणि हो, कानात भिकबाळी सुद्धा होती. आता निरोप ऐका आणि आमची सुटका करा. ते म्हणाले, दिगंबराजवळ म्हणजे त्यांच्या मुलाजवळ निरोप द्या की त्याची म्हणजे तुमची सून बाळंतपणाला माहेरी बुधगांवला गेली आहे. ते म्हणजे ते गृहस्थ पुढे म्हणाले की ते प्रथम बुधगांवला जाणार आणि त्यांच्या भाषेत - 'यथावकाश' सांगलीला तुमच्याकडे येणार आहेत. निरोप संपला. माझं काम झालं. चला मंडळी, आता पायी जाण्याशिवाय गत्यंतर नाही. मी हमाल मिळतो का ते पहातो. माझंच चुकलं. मी असले लांडे कारभार करायला नको होते !"

"थांबा राव. असे रागावू नका. शांतपणे बसा. तुम्ही सांगितलेला तपशील शंभर टक्के बरोबर आहे. पण .. पण एकच फरक आहे. कसा सांगणार तुम्हाला? अहो, ते माझे वडील असणंच शक्य नाही."

"पण का? इतर तपशील बरोबर. त्या गृहस्थाचं वर्णन बरोबर. मग अशक्य काय आहे?"

" अहो माझे वडील गेल्या वर्षी वारले. ते तुम्हाला गाडीत कसे भेटणार? दुसरं कुणी म्हणावं तर सर्व तपशील बरोबर."

" अहो, पण हल्लीच्या दिवसात डोक्यावर पगडी घालणारे, गळ्यात उपरणं घेणारे कोणी आहेत का? या पोषाखामुळेंच मी त्यांचं वर्णन केलं. समजलं?"

"थांबा. आता गोष्ट इथवर आली म्हणून सांगतो. शेवटच्या आजारपणात ते मला म्हणाले, दिगंबरा, आपलं घराणं कथेकऱ्याचं. मी कधी कीर्तनाला उभा राहिलो नाही. वडिलांनी मोठ्या प्रेमानं मला उपरणं आणि पगडी घेऊन दिली. पण मी ती कधी वापरली नाही. तुम्हाला तर या गोष्टी डोळ्यासमोर नकोत. त्या तुम्ही बोहारणीला देऊन टाकणार आणि त्या कुणाच्या तरी हातात जाणार. छे! छे! असं होता कामा नये. हे बघ दिगंबरा, माझ्याबरोबरच उपरणं आणि ही पगडी सरणावर जाऊं द्या. जिवंतपणी नाही तर परलोकात तरी घालीन. आणि एकच गोष्ट राहिली बघ. तुझ्या आईला भिकबाळीचा शोक. मी भिकबाळी घालावी म्हणून तिनं पै पै जमवून जगन्नाथशेटकडून परस्पर माझ्यासाठी भिकबाळी करवून घेतली. मला ती मुळीच आवडेना. हे बघ, मला स्मशानात नेताना माझ्या कानात ही भिकबाळी घाल. परलोकांत तुझ्या आयशीशी गांठ पडली तर माझ्या कानातली भिकबाळी बघून तिला तेंव्हा तरी समाधान वाटेल."

हे सर्व सांगतांना दिगंबरांचा गळा दाटून आला होता. हे सर्व बोलणं होत असतांना त्यांच्या सौ., माझ्या सौ. आणि माझी मुलं सगळी गोळा झाली होती. मला तर वाईट वाटत होतंच. पण आपली गांठ एका भुताशी पडली होती आणि आपण खुशाल त्याच्याबरोबर गप्पा मारल्या याची जाणीव होताच माझ्या अंगावर काटा उभा राहिला.

मुंबईला परतल्यावर शेजारच्या बंडोपंतानी एक बंद पत्र पाकीट माझ्या हातात दिलं. पत्र येऊन १५-२० दिवस झाले होते. मला फारशी पत्रे येत नाहीत. व मीही कुणाला पत्र लिहिण्याच्या भानगडीत पडत नाही. मला पत्र आल्याचं समजतांच घरची माणसं गोळा झाली. पत्र दिगंबराचं होतं. पत्रात ते म्हणत होतेः

"माझी सून परवांच बाळंत झाली. बाळ बाळंतीण खुशाल आाहेत. मला नातू झाला. पणतू झाल्याबद्दल आमचे आईवडील परलोकात खरंच सुखावले असतील. त्यांचे दर्शन घडण्याचा योग तुमचा होता. आमचा नाही. आणि एक आश्चर्याची घटना. माझ्या नातवाचा कान वरच्या बाजूला म्हणजे भिकबाळी घालतात तिथे जन्मतःच टोचलेला आहे. कुणी टोचला ईश्वराला माहीत. आमचे तीर्थरूपच नातवाच्या पायानी आले असे आम्ही मानतो. एवढ्या लांब पेढे पाठविता येणे अशक्य. मी तुम्हाला नमस्कार करू की आशीर्वाद देऊ? काय योग्य असेल ते मानून घ्या. पण पुढच्या वर्षी तुमचा मुक्काम आमच्याकडे. तुम्ही उभयतांनी आमचा नातू मांडीवर घेतल्याशिवाय आम्हाला चैन पडणार नाही. रक्ताच्या नात्यापेक्षा प्रेमाचं नातं अधिक जवळचं असतं. पुढल्या वर्षी आम्ही सगळे आपली वाट पहात आहोत."

-०००-



# एक पान कवितेचे

## (१)

### "दु:खा" चे दु:ख

प्रेषक: कु.अस्मिता अ.खांबेटे(पृ.६७६), रसायनी
दूरध्वनी-(९५२१९२)२५०५६७

'दु:खा'च्या घरात एकदा
जमली होती पार्टी
दारू बिरू पिऊन अगदी
झिंगली होती कार्टी

दु:ख म्हणाले, "दोस्तानो!
बिलकुल लाजू नका
इतके दिवस छळलं म्हणून
राग मानू नका!

मनात खूप साठलं आहे
काहीच सुचत नाही
माझी स्टोरी सांगितल्याशिवाय
आता राहवत नाही........

"मी आणि सुख दोघे
जुळे भाऊ होतो
पाच वर्षाचे होतो तेव्हा
जत्रेत गेलो होतो

गर्दी अशी जमली
नि गोंधळ असा उठला.
माणसांच्या त्या गर्दीमध्ये
सुखाचा हात सुटला!"

तेव्हापासून फिरतोय शोधत
दुनियेच्या जत्रेत
दिसतोय का सुख माझा
कुणाच्याही नजरेत ".........

सुखाबरोबरचे लहानपणीचे क्षण त्याला स्मरले
आणि सुखाच्या आठवणीने दु:ख ढसाढसा रडले!
(इंटरनेटवरून संकलित)

## (२)

### चारोळ्या

डॉ.सौ.सीमा श्याम मराठे, (पृ.४११), पुणे
दूरध्वनी-(?)

**१)** वागणाऱ्याने स्वत:ला कधीही सवलत ठेवू नये
एकदा चूक लक्षात आली की पुन्हा ती करू नये
कमी अडाणी माणसाला शहाणा समजू नये
आणि शहाण्याचा कदापीही अंत पाहू नये

२) कसली ती हिरवळ कसली हिरवी उपवने
कोणतीच न राहिली गारव्याची ती कारणे
पावसाच्या धारा नाही ओसंडत आता
सिमेंटच्या फटकाऱ्यांना तोही भिवून होता

३) जाता जाता कळले तुझ्या नजरेचे सांगण
पुन्हाभेट मला हेही होते त्यात विनवणे
कसे नाही उमजले मला अगोदरच कोण जाणे
तरीही जाता जाता पसरले अंगभर चांदणे

४) धूरासोबत माझी दु:ख
वर अकाशात जायला हवीत
पण, अग्नी असेपर्यंत
धूर अन् दु:ख दोन्ही असणारच

५) नयनांत साठविलेले ते रंग होते नभीचे
हृदयात गुंफिले होते सुगंध सुमनांचे
तो समीर गुंजताना श्रवणात कसा रमला
प्रेमात तुझ्या प्रियकरा हा जीव पुरा गुंतला

-०००-

## (३)

### आजी नाही म्हणून..

श्री. वामन गणेश मराठे,(पृ.५०३), जोगेश्वरी
दूरध्वनी २८२६९४०२

आजोबा आजोबा देऊ का काठी ?
झाली माझी साठी काठी, हवीच रे आता हाती!

घेईन तुला पाठीशी, दाविन तुला गंमत खाशी
*आजी नाही म्हणून* मी, राहीन मात्र उपाशी

लोणी-पाव, रोटी-तूप? बैस कसा गुपचूप!
*आजी नाही म्हणून,* दूध आणू कुठून?

पापड सांडगे फेण्या अन्, प्रिय मला कुरडया
*आजी नाही म्हणून* का, कुणीच नाही दिल्या ?

शेंगदाणे होते भाजलेले, गरम पकोडे तळलेले
*आजी नाही म्हणून*, कुणी लपवून ठेवलेले?
डबा बंद झाला पण, वास मला आला
रक्ताचा दाब जरा, वर खाली झाला

*आजी नाही म्हणून* आता, सगळेच सांगतात मला,
कोलास्टरोल वाढला, चहाला साखर कमी घाला
रबडी पनीर कशाला, पुरे सॅलड आणि पाला,
सगळे सांगतात मला, आता जिभेला आवर घाला.

*आजी नाही म्हणून* हळूच, फोटो येतो पाहून
सोडून मागे मला अशी, गेलीस कशी निघून?

-०००-


**चुकीची दुरुस्ती -**
**हितगुज अंक ६६-जून २००६**
**सभासद वृत्त पृ.३**

<u>सामाजिक बांधिलकी निभावणारी</u>
<u>सौ.भाग्यश्री मराठे-शमा</u>

या शीर्षकाखाली <u>सौ. भाग्यश्री</u> यांनी ब्लाईंड रिलिफ असोसिएशनला दिलेल्या देणगीची रक्कम रु.२१०० छापली आहे. ती रु. २५००० वाचावी असे श्री. द. कृ. मराठे यांनी ईमेलने कळविले आहे.
क्षमस्व.

पणजोबा

प्रभाकर शिवराम मराठे
यांच्या स्मरणार्थ



प्रभाकर दामोदर मराठे
वडाळा, मुंबई ४०००३१
सेल: ९८२० २३२ ०८२
दूरध्वनी : २ ४१५ ०८८९

# खजुराहो

मोहन सदाशिव मराठे (पृ.३६५), खार. दूरध्वनी-२६४६६४३५१

आम्ही घरच्या १० मंडळींनी मध्यप्रदेशची सहल काढली व सतनाच्या टूरिझम हॉटेलमधून ३० ऑक्टोबर २००६ रोजी खजुराहोच्या मंदिरांना भेट देण्याच्या उद्देशाने प्रस्थान केले. सतना ते खजुराहो हा १२५ किमीचा प्रवास आम्ही सुमो गाडीने ३ तासात केला. रस्ता मधेमधे खूपच खराब होता. गाडीत जोराचे धक्के बसत होते. खजुराहोच्या पश्चिम विभागातील पाच मंदिरे पाहून व परतीच्या वाटेवरच्या पांडव फॉलला भेट देऊन अम्ही सटनाच्या हॉटेलवर परतलो.

खजुराहो-खर्जुराह-खजुरांच्या झाडांचे गांव याठिकाणी चंदेला राजघराण्याच्या कारकीर्दीत इ.स. ९०० ते ११३० या कालावधीत या मंदिरांची उभारणी झाली. एकूण सुमारे ८५ मंदिरे बांधली होती त्यांतील २०-२५ सुस्थितीत आहेत. पैकी पश्चिम गटात मोडणारी ५ मंदिरे सर्वोत्कृष्ट समजली जातात. ही मंदिरे पहायला आम्हाला अडीच तीन तास लागले.

चंदेला या राजपूत (चंद्रवंशीय) क्षत्रीय घराण्याची हेमवती ही मूळ माता समजली जाते. ती गहिरवारचा राजा इंद्रजित याच्या (ब्राह्मण) पुरोहिताची अतिशय सुंदर कन्या होती. तिवा विवाह १४ व्या वर्षी झाला. पण तिला १६व्या वर्षीच वैधव्य प्राप्त झाले. ती एकदा एका निर्जन सरोवरात स्नान करत असताना चंदेल घराण्यातील राजपुत्राची तिच्यावर नजर पडली. चंद्रासारख्या सुंदर राजपुत्रावर तीही मोहित पडून भाळली. त्यांच्या मधुर मीलनातून पुत्र झाला.तो चंद्रात्रेय-चंदेल घराण्याचा मूळ पुरुष राजा चंद्रवर्मन. ह्या घराण्यातील यशोवर्मन हा अतिशय पराक्रमी होता. त्याने अनेक मुलूख पादाक्रांत केले. तो न्यायी व शिल्पकलेचा भोक्ता होता. त्याच्या एका दासीवर कोणा एका पुरुषाने बलात्कार केला. त्या दासीची चौकशी करताना ती कुणाचेच नाव सांगेना म्हणून राजा चंद्रवर्मनने तिची जीभ कापून टाकण्याची सजा फर्मावली. त्याचे सेवक जीभ कापावयास गेले तर ती आधीच कापून टाकलेली दिसली. महाराणी दरबारात कोसळली.तर राजा चंद्रवर्मन विमनस्क अवस्थेत महालात परत गेला.रात्रभर त्याला झोप नाही.उशीरा डोळा लागला तेव्हा त्याच्या स्वप्नात हेमवती आली व तिने आपली कहाणी सांगितली व तो मोहाचा क्षण टाळण्याची प्रेरणा मिळण्यासाठी एका मंदिराची उभारणी करण्यास सांगितले. राजाने तसे करण्याचे ठरविले. आपल्या पूर्वजांचा खरा इतिहास त्याने कुणालाही-महाराणीलाही सांगितला नाही. आपला राजकवी व विश्वासू मित्र माधव यास अशा मंदिरांच्या उभारणीच्या कामासाठी योग्य शिल्पकार शोधून आणण्याची कामगिरी सोपवली. त्याचा राजशिल्पकार चंद्रवर्मा ह्याच्यावर हे काम सोपवावे असे त्याला अजिबात वाटले नाही माधवने



नांवगांव विचारले. तिला काहीच माहित नव्हते. तो कुठल्या दिशेने निघून गेला इतकेच तिने सांगितले. उत्कल(ओरिसा), आध्रप्रदेश, गुजराथ ह्या राज्यात शिल्पकाराचा शोध घेतला. पण त्याला यश आले नाही. मात्र रात्रीच्या वेळी एका झोपडीतील अप्रतिम शिल्प पाहून त्याने तेथल्या स्त्रीला त्या शिल्पकाराची माहिता माधवला असा शिल्पकार शेवटी खजुराहोच्या जवळच सापडला. तो स्वतः एका मोहाच्या क्षणी एका स्त्रीला बळी पडला होता. व तीही त्याच्या गुरूची पत्नी होती. तेंव्हा मोहापासून दूर जाऊन तो शिल्पे बनवू लागला. आपले दुःख तो पचवू पहात होता. माधवने त्याला शिल्प बनविण्यात रममाण झालेले पाहिले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यावेळी मॉडेल (प्रतिमा) म्हणून बसली होती राजा चंद्रवर्मनची एकुलती कन्या अलका! माधवने त्या शिल्पकाराचे नांव-मेघराज आनंद- राजाला सुचविले. राजा चंद्रवर्मनने एका जख्खड म्हाताऱ्याच्या रूपात जाऊन शिल्पकाराचे आपल्या कन्येसोबतच्या वर्तणुकीवरून शील जोखले. त्याला मंदिराच्या उभारणीसाठी दरबारात येण्याचे आमंत्रण दिले. शिल्पकाराने थोडा वेळ मागून घेतला व मंदिराचे संपूर्ण आराखडे तपशीलवार तयार करून तो दरबारात गेला. देवळाबाहेर तथाकथित स्त्रीपुरुष संबंधांची चित्रे योजिली होती. धर्ममार्तंडांना राजाने दरबारात बोलावून ठेवले होते. काही जणांनी पाठिंबा दिला तर काहीनी कडवा विरोध केला. त्या सर्वांना शिल्पकार मेघराजने समर्पक उत्तरे दिली. धर्मशास्त्रात धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांना बरोबरीचे स्थान दिले आहे. अथर्ववेदाच्या ५३६ मंत्रातले ३६ मंत्र केवळ कामविषयावर आहेत. भोग व योग ह्यामध्ये विभाजक रेषा खेचली जाऊ शकत नाही. भगवान विष्णूच्या मंदिराबाहेर काममूर्ती बनविण्याचा एक उद्देश विद्युत् देवता (इंद्र) व वर्षा देवता (वरुण) ह्यांना आकर्षित करून मंदिराला आग, वीज पाऊस, चक्रीवादळे यांपासून धोका टाळावयाचा होता. बाहेरची कामुक चित्रे पाहूनही निर्विकार मनाने सामान्य भक्तजन विष्णूदर्शनासाठी आत जातील. राजा चंद्रवर्मननेही शिल्पकाराला सहमति दिली व मंदिराचे काम मेघराज आनंदकडे सोपविण्यात आले. ते त्याने उत्तम रितीने पार पाडले. राजा सर्व धर्माना समभावाने वागवत होता. त्यामुळे जैन व बौद्ध धर्मीयांची मंदिरे पण उभारली गेली.

पश्चिम विभागातील कंदारिया विभागातील महादेव,जगदंबी, चित्रगुप्त, विश्वनाथ(नंदीसह) व विष्णूला वाहिलेले लक्ष्मण मंदिर पाहिले. ही मंदिरे अत्यंत भव्य असून ती वेगवेगळ्या रंगातील बारिक वालुकामय दगडातून उभारली आहेत. अतिशय स्वच्छ दिसतात. मंदिराचा चौथरा खूप उंचावर आहे. देवळाची शिखरे कलात्मक रीत्या उभारली आहेत. चारी बाजूनी भिंतीवर मिथुन चित्रे, प्राण्यांची चित्रे, युद्धाला निघालेले सैन्य, हत्तीदळ, घोडदळ, इ.इ. पहावयास मिळते. आणखी पायऱ्या चढून गेल्यावर मुख्य मंदिरात प्रवेश करता येतो. तेथेही आत शिल्पचित्रे आहेत, देवाची मूर्ती आहे. पण बाहेरच्या स्वच्छ व उजळ वातावरणाच्या विरुद्द आत वातावरण आहे. हे पूजेचे मंदिर नसल्याने आत गलिच्छ, घाण वास येतो, वटवाघुळे आहेत, कबुतरे व इतर पक्षांच्या विष्टा आहेत. आपल्या या पुरातन वास्तू हा आपला बहुमोल सांस्कृतिक वारसा आहे. त्याचे जतन, संवर्धन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहेच. पण त्या ठिकाणी किमान स्वच्छता राखून तेथे येणाऱ्या पर्यटकांच्या मनात त्या वास्तूंची उजळ प्रतिमा कायमची कोरून ठेवावी हे पाहण्याची जबाबदारी स्थानिक व्यवस्थापनाची नाही काय?

-०००-

**वै.चिंतामण भा.मराठे**
**स्मृती हस्ताक्षर स्पर्धा.२००७**
**निकाल**

क्र. १- श्री.सदानंद विष्णू मराठे रु.२५०
भाऊ मराठे,( दादर.

क्र. २.-श्रीमती सुप्रिया मराठे-लिमये, रु.१५०
(पृ.२४७)पुणे

क्र. ३.-श्रीमती पल्लवी वि.मराठे, रु.१००
गोवा

(या संदर्भातील संचालकांचे पत्र सदस्य संवाद या सदरात प्रसिद्ध केले आहे. -संपादक)

# तुमचे आमचे संवाद

सौ. मंगला प्रवीण मराठे (पृ.३६१),गोरेगांव प.-मुंबई ४०००६२
दूरध्वनी-२८७३६१०८

*(स्त्रीमुक्ती, स्त्री-सबलीकरण आणि स्त्रीपुरुष-समानतेच्या संदर्भात आजच्या युगात आपण बरीच प्रगती केली आहे असे मानण्याची प्रथा आहे. पण दैनंदिन व्यवहारातील आपल्या नित्याच्या संभाषणातून जे वास्तव प्रतिबिंबित होते त्याचे प्रतिष्ठानच्या एक उत्साही कार्यकर्त्या व 'स्वाधार' या स्त्री-सहाय्यासाठी झटणाऱ्या संस्थेच्या सक्रिय समुपदेशिका सौ. मंगलाताई यांनी केलेले हे सूक्ष्म अवलोकन जागरूक वाचकांना निश्चितच अंतर्मुख करणारे आहे. आपल्या प्रामाणिक प्रतिक्रियांची अपेक्षा आहे -संपादक)*

प्रिया दत्त, सुप्रिया सुळे, प्रज्ञा शिंदे या सगळ्या आपल्या पित्याच्या वारसदार म्हणून राजकारणाच्या आखाड्यात उतरल्या आहेत. ही बातमी देताना प्रत्येक वाहिनीवरील निवेदनाचा सूर असा होता की, पित्याची वारसदार ठरण्यासाठी या मुलींना बरेच काही करून दाखवावे लागेल. स्वतःला विषेशत्वाने सिद्ध करण्याची जबाबदारी या मुलींवर आहे.

"आता यांच्या मुलीसुद्धा यायला लागल्या" अशी थोडीशी कुत्सित प्रतिक्रिया काही लोकांनी दिली.

"यांना काय घरात काही करायचं नसतं, मग राजकारणात आल्या." असा एक शेराही काही जणांनी मारला.

या मुलींनी काही चांगले करून दाखववे हे खरेच आहे. पण हा सूर लक्षात राहिला कारण यापूर्वी अनेक नेत्यांचे मुलगे आले तेव्हा असा सूर नव्हता. त्यांच्या त्यांच्या विरोधकांनी घराणेशाहीचा आरोप केला इतकंच.

थोडा विचार केल्यावर लक्षात आलं की राजकारणाबातच नाही तर अनेक बाबतीत आपण असंच काहीसं बोलतो. काही उदाहरणे बघूया.

**नवजात शिशूचे स्वागत**

कुठल्याही जोडप्याला पहिला मुलगा झाला तर घरात आनंदोत्सव होतो. लोकही म्हणतात, "पहिल्याच वेळी मुलगा झाला की मग टेन्शन नाही"

पहिली मुलगी झाली तर ... "काही हरकत नाही पहीली बेटी धनाची पेटी" म्हणायच.

कोणाला दुसरी मुलगी झाली की....."काही होत नाही. हल्ली मुलगा काय आणि मुलगी काय दोन्ही सारखंच. अजिबात वाईट वाटून घेऊ नका."

ज्यांना दुसरी मुलगी होते ते म्हणतात, "सगळे उगीच समजूत घालतायत. आम्हाला खरं तर काही वाटलेले नाही." पण या बोलण्यात फारसा जोर मात्र कधीच दिसत नाही.

जर कोणाला दुसराही मुलगा झाला तर...कोणी असे काहीच बोलत नाही.

**विवाहविषयक जाहिराती**

वर.....जातीचा, उच्चशिक्षित, सुस्थित वगैरे.
अपेक्षित वधू... स्वजातीय, अनुरुप, नोकरी करणारी-शक्यतो सरकारी नोकरीतली.(बँकेतली असल्यास चालेल!)

**विवाहेच्छू व त्यांच्या पालकांचा संवाद**

१. "चला पोरीला बँकेत नोकरी लागली."

"आई तुमच्या कटकटीमुळे मला आताचा जॉब सोडावा लागतोय."

"आधीच्या नोकरीत पगार जास्त होता. पण वेळेचा काही ठिकाणा नव्हता. अशा नोकऱ्या स्थळांना पसंत पडत नाहीत ."

"सोनु अग काय ग तुझं हे ऑफिस? रोज रोज उशीर होतो. घरातलं करायला कधी शिकणार? उद्या लग्न झालं की जड जाईल. "

"आई, अग इतका चांगला जॉब आहे. काम इंटरेस्टींग आहे. एव्हढा पगार घेतेय. घरकामाचं काय घेऊन बसलीस. मी बाई ठेवीन कामाला"

२. "अरे गेले वर्षभर तू बाहेर आहेस. आता परत सहा महिने चाललायस. मग या मुली सांगून आल्यायत त्यांना काय सांगायच? "

" सांग थोडे दिवस थांबायला "

३. "अग अशी पुन्हापुन्हा जात राहिलीस तर स्थळं कशी बघायची?"

"आई, अग खूप चांगला प्रोजेक्ट आहे हा. स्थळं नंतर बघा."

"अग नंतर बघा काय? थांबणार आहेत का लोक आपल्यासाठी?"

**विवाहेच्छूंच्या पालकांमधला संवाद**

"मुलीचे शिक्षण वगैरे चांगले आहे. पण प्रायव्हेट सेक्टर मधली नोकरी म्हणजे ऑफिसच्या वेळेचा काही ठिकाणा नसतो. त्यात मग घरातल बघायचं म्हणजे तिचीच फार तडतड होईल. आमच्या मुलालाही ऑफिसमधे रोजचाच उशीर होतो. त्यामुळे त्याला घरात काही बघायला फुरसद नसतेच. म्हणून आम्हाला सरकारी-१० ते ५ वाल्या नोकरीतली मुलगी हवी. "

**बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरीसाठी, वारंवार परदेशी जाणाऱ्या मुलाबद्दल,**

" मुलाला परदेशी कंपनीत चांगल्या मोठ्या पगाराची नोकरी आहे. सारखा फॉरेनला जात असतो. अगदी सोन्यासारख स्थळ आहे."

**त्याच नोकरीतल्या मुलीबद्दल,**

"नोकरी चांगली आहे, पगार चांगला आहे खर आहे. पण असा एक पाय बाहेर असला तर त्या संसाराला काय अर्थ रहाणार? शिवाय परदेशात वावरणारी मुलगी, तिची स्टाईल आपल्याला झेपायची नाही. उगाच नाकापेक्षा मोती जड नको! "

"मला वारंवार परदेशी जावे लागते. दरवेळी फॅमिली नेता येतेच असे नाही. हे मान्य असणारी आणि इथे सगळं सांभाळणारी मुलगी हवी."

मुलाचे आईवडील म्हणतात, "आधीच सांगितलेले बरे म्हणजे मग कुरबुरी व्हायला नकोत."

**नातवंडांना घेऊन बागेत जमलेल्या आजी अजोबांमधला संवाद**

"आमचा मुलगा सध्या सिंगापूरला गेलाय ना वर्षभरासाठी; मग आम्ही मधून मधून इकडे रहायला येतो. सुनेला जरा मदत होते. "

मुलीचे आईवडील असले तर, "जावई परदेशी गेलाय म्हणून मुलीच्या सोबतीला आलोय " असे अगदी कौतुकाने, अभिमानाने सांगतात.

**मुलगी/सून परदेशी गेली असता** सासू सासरे **म्हणतात,**

"सध्या नातीची जबाबदारी आहे ना? तिची आई सहा महिन्यांसाठी सिंगापूरला गेली आहे. तशी रहाते ती आमच्या बरोबर, रडत नाही. लहान मुलगी आहे म्हणजे आईची आठवण तर येतच असणार. कसल्या यांच्या नोकऱ्या आणि करिअर? लेकरं टाकून कसलं जायचं"

"मुलीचे आईवडील म्हणतात, आपल्या मुलीची नोकरी अशी. ती नसताना जबाबदारी आपण घ्यायला पाहिजे. आमच्यावर टाकून जाते असं सासरच्यांनी म्हणायला नको. उगाच आपल्या मुलीला काही ऐकून घ्यायला नको. पण लेकराच वाईट वाटत हो. मुलाला आई नको का जवळ."

**दोन मैत्रिणींमधला संवाद**

"अग नाही ग, मी नाही बसणार परिक्षेला. अभ्यास कसा होणार सांग. घरातल सगळ आहे, मुलांचा अभ्यास आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल मार्क कमी पडले तर? नको उगाच. मग सगळ्यांच ऐकून घ्यायला लागेल आणि निस्तरायलाही लागेल. त्यापेक्षा जाऊ दे ते प्रमोशन. सोडून द्यायच. खाऊन पिऊन सुखी आहोत पुरे झाल. "

"अग अस कां म्हणतेस? मुलांना समजावून सांग . घेतील ती जमवून. मिस्टरांशी बोललीस का?"

"बोलले. म्हणाले वर्षभर म्हणजे फार होत ग. घराची पार उलथापालथ होईल. आणि कशाला हवंय ते प्रमोशन? मस्त मजेत आहोत आपण. तस नाही; तुला मोठी अधिकाराची जागा मिळाली तर मला आनंदच होईल ग. पण प्रमोशनबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या आणि डोकेदुखीचा हिशोब कर. ऑफिसमधे वाढल्या म्हणून घरातल्या कमी होणार आहेत का? उलट मुलं मोठी होतील तशा वाढतच जातील. त्यातून तू बघ. तुला मॅनेज होणार असेल तर माझी काही हरकत नाहीय. पण तुला माहित आहे मला घरातल

किती जमतं ते.''

**पती पत्नी मधला संवाद..**

पती- "अग मला प्रमोशनचा चान्स आलाय''

पत्नी- "अय्या हो ! छान ''

पती- "बाईसाहेब, नुसत हातात नाही पडणार, परीक्षा द्यावी लागणार आहे. वर्षभर अभ्यास करावा लागणार आहे. मी अस करतो,संध्याकाळी ऑफिसच्या लायब्ररीत बसतो. घरी आलो की मुलांमधे आणि टीव्ही मधे अभ्यास होणार नाही. जमलं तर सकाळी लवकरसुध्दा जाईन. हे प्रमोशन मिळायलाच हवं. माझ्यासाठी फार प्रेस्टिजिअस आहे. घर मात्र तुझ्या एकटीवर पडेल. पण थोड्याच दिवसांचा प्रश्न आहे. आणि तुला काय, यु आर अ गुड मॅनेजर. यु कॅन मॅनेज एव्हरीथिंग. मग करु ना अर्ज ?''

पत्नी- "अरे कर की. त्यात काय एव्हढ ? माझी थोडी धावपळ होईल.पण चालेल करीन मी काहीतरी.''

**सासू जावयातला संवाद**

सासू- "तुमच्याकडे नेहेमी चपात्या नसतात ना.''

जावई- "नाही आई, आमच्याकडे भातावर जोर असतो. नीता म्हणत होती इकडे दोन्ही वेळा चपात्या असतात म्हणून''

सासू- "त्याच काय आहे, आम्ही मूळचे देशावरचे ना. शिवाय मी घरीच होते ना. त्यामुळे या मुलांना सवय लागली. आमच्या समीरला तर तिन्ही त्रिकाळ चपाती लागते. नीताला होईल आता भाताची सवय. तशी तिची काहीच तक्रार नाही. ती काही म्हणत नव्हती. मी आपली सहज एक गोष्ट सांगितली.''

**त्याच घरातला सासू सुनेतला संवाद**

सासू- "अग चपात्या तर लागणारच.''

सून- "अहो पण आई, ह्या करीबरोबर भातच चांगला लागणार.''

सासू- "तरीपण आमच्याकडे तस नाही चालत. समीरला तर चपात्या लागतातच. थोड्या तरी चपात्या करुया.''

असले संवाद आपण बऱ्याच वेळा ऐकतो. त्यात आपल्याला फारसे काही वेगळे वाटत नाही.


त्याजागी एखाद्या मुलीने सांगितले की "माझी नोकरी अशी आहे की मला वारंवार परदेशी जावे लागते. माझे रोजचे office hours सुध्दा जास्त आहेत. मला सगळ्याच घरगुती गोष्टींना इतर बायकांइतका वेळ देता येणार नाही. त्यामुळे मला नॉर्मल १० ते ५ नोकरीतला आणि घरातलं बघू शकणारा मुलगा हवा.''... तर ऐकणारे सगळे सटपटतील. तिच्या आई वडिलांना सुध्दा वाटेल की काय हे ह्या पोरीचं बोलणं ?

शहरी उच्चशिक्षित, मध्यमवर्गीय माणसांच्या घरातले सहजपणे बोलण्यात येणारे हे संवाद. "माणसं चांगली आहेत '' या गटात येणाऱ्या लोकांच्या तोंडची ही वाक्ये आहेत.

या वर्गातल्या कुटुंबाचे आजचे चित्र पाहिले तर ते फारच मोहक आहे. घरात सुखसोयीची साधने असतात. मुलींना घरात फारशी कामे करावी लागत नाहीत. त्या मुलांच्या बरोबरीने शिकतात. काही वर्षापूर्वी मुलांच्या मानल्या जाणाऱ्या इंजिनिअरिंग क्षेत्रात मुलींची संख्या मोठी आहे. उलट मुलांनाच अजूनही होम सायन्ससारखे कोर्सेस नाहीत, त्यांना बालवाडी शिक्षक म्हणून घेत नाहीत. लग्न झालेल्या मुलींनाही पूर्वीसारखं सासुरवासात आणि धाकात रहावे लागत नाही. पुरणपोळ्या, दिवाळीचा फराळ असे दमवणारे पदार्थ त्या विकत आणू शकतात. घरातल्या छोट्या मोठ्या समारंभांना जेवणाची बाहेर ऑर्डर देतात. अधेमधे हॉटेलिंग होते. एकूण काय, हल्ली मुलींचे आयुष्य कष्टाचे राहिलेले नाही. मुलींचे माहेर तुटत नाही. दोघांचेही एकमेकांकडे जाणे येणे, रहाणे व्यवस्थित आणि सहजपणे चालू असते. बायकांच्या हातात पैसाही असतो . रोजचे व्यवहारही त्यांच्या त्याच बघतात. "स्त्री-जन्मा तुझी कहाणी'' म्हणावे असे काहीही नाही. म्हणजे या छोट्याशा वर्गातल्या स्त्रियांपुरत्या तरी समस्या संपल्या, या मुठभर कुटुंबांमधे तरी समानता आली.

पण हे खरे नाही. हा नुसता वरचा मुलामा आहे. सगळे पारंपारिक निकष जोपर्यंत लागू होत असतात तोपर्यंतच हा मुलामा टिकतो. परिस्थिती थोडी जरी बदलली तरी तो लगेच गळून पडतो. आपल्या नेहेमीच्या बोलण्यातून हे जाणवते. अगदी राजकारणातल्या घटनांपासून ते एखाद्या बाळाच्या जन्मापर्यंत सर्व घटनांच्या बाबतीत दिसते. वरपांगी आपल्याला भासतंय की आपण खूप सुधारलोय. पण प्रसंगी मनाच्या कोपऱ्यात दडलेले ओठावर येतेच. त्यातून स्त्रीचे दुय्यम स्थान दिसते आणि तिच्या मनावर ओरखाडाही येतो.

तुम्हीसुद्धा असे काही बोलता का ? आठवा.विचार करा.(आणि आामच्याकडे पाठवा - संपादक) -ooo-



नवीन उपक्रमांसाठी आवाहन

## १.हितगुजची हेल्पलाईन

आपल्या परिवारात अनेक व्यक्ति अशा आहेत की ज्या काही विशेष सेवा, मार्गदर्शन, सल्ला देऊ शकतात. उदा. वैद्यकीय क्षेत्रातले तज्ञ, थेरपिस्ट, वकील, समुपदेशक, लेखापरिक्षक, इन्व्हेस्टमेंट एजंट, वास्तूविशारद इ. आपल्यापैकी प्रत्येकाला कधी ना कधी अशा सेवा सुविधांची गरज लागते. बऱ्याच वेळा असे होते की आपल्याला हवी असलेली नेमकी मदत कुठे मिळेल हे माहित नसते. हितगुज ही माहिती देणारा दुवा बनू शकतो. काही व्यक्ती खूप वेगळ्या प्रकारचे कार्य करत असतात. पण बऱ्याच जणाना असे काही काम अस्तित्वात आहे हे सुध्दा माहित नसते. अशा सर्व व्यक्तींनी हितगुजकडे आपली माहिती पाठवावी किंवा नसलेल्या माहितीसंबंधी '**कुठे ? कुणाकडे ?**' अशी पत्राने विचारणा करावी त्यातून '**हितगुजची हेल्पलाईन**' तयार होईल आणि तुमच्या कामाची माहिती परिवारातील सर्वांपर्यंत पोहोचेल. हितगुज खऱ्या अर्थाने संपर्क माध्यम बनेल. परिवारातील व्यक्तींसाठी खास सवलत देऊ इच्छिणाऱ्या सेवा-दात्यांनी आमचेकडे प्रस्ताव पाठविल्यास त्याना हितगुजच्या माध्यमातुन प्रसिद्धी दिली जाईल. -संपादक

## २. मराठे परिवार कट्टा

हितगुजतर्फे स्थानिक पातळीवर नियमितपणे काही छोटे छोटे कार्यक्रम आखावेत. जसा एखादा संवाद गट असतो. ज्यात सहभागींना स्वतःला व्यक्त व्हायला(अत्रे कट्ट्याप्रमाणे), बोलायला संधी मिळेल; ज्यामुळे लोक अंकात अधिक रस घेऊ लागतील; लोकांचा एकमेकांशी परिचय व संवाद होईल. असा एखादा उपक्रम सुरु करण्याचा मानस आहे. अन्यथा वार्षिक मेळाव्याखेरीज लोक एकमेकांना भेटतच नाहीत. मेळाव्याला येणे प्रत्येकाला शक्य होतेच असे नाही.याबाबत वाचकांनी त्यांच्या कल्पना हितगुजकडे पाठवाव्यात.

यासाठी कृतिशील वाचक-सदस्यांनी आपल्या ideas पाठवाव्यात. जर कुणाचे घर मोठे असेल तर तिथेही असा कार्यक्रम आपण घेऊ शकतो. हॉल वगैरे घेण्याची काही गरज नाही.

वार्षिक मेळाव्याखेरीज लोक एकमेकांना भेटतच नाहीत. मेळाव्याला येणे प्रत्येकाला शक्य होतेच असे नाही. त्या दृष्टीने हा उपक्रम उपयोगी ठरेल. यातून नवीन कार्यकर्तेही तयार होतील.

अशा एखाद्या स्थानिक अभिनव उपक्रमाला प्रतिष्ठानचे केवळ उत्तेजन व प्रसिद्धीच नव्हे तर सक्रिय मार्गदर्शन व सहाय्यही मिळू शकेल.

-संपादक

## SARDAR JOKE

*-Asmita A. Khambete (P.676)*
(Phone-952192-250567)

There is a group of 7 Sardars who plan to meet their old friend, the President Dr. Zail Singh. The Sardars decide to take a taxi. The taxi driver takes them to Rashtrapati Bhavan. The meter shows Rs.28/-,so the taxi driver says, “You have to pay me Rs.28/-” Now, the Sardars have to share the cost among themselves and so they decide to divide the total (Rs. 28/-) by the number of people, i.e. 7. This is how they do the calculation to arrive at the answer:

7 | 28=13( 7 x 1 = 7, 7 x 3 = 21).
7
—
21
21
—
0
—

The driver is exceedingly happy upon receiving Rs. 13/- from each of the Sardars. He thanks them profusely and the feeling of happiness is writtern on his face as he leaves them and proceeds his way. Seeing this, the Sardars feel that they may have made a mistake. They decide to ask Zail Singh about it. After all, the fellow was the President of the nation!

They ask Zail Singh to check their calculation of the taxi fare. Zail Singh ponders over the calculations and finally says, “See, I am not good at division. The process just boggles me but addition is something I am an expert at. Let us add all the amounts you guys gave to the taxi driver and check the result. This is how I do for those tax forms I get very often. The process is slow but is sure.” The other sardars nod their heads (?) in appreciation.

The President writes as shown below and also explains as he writes on:

13
13
13
13
13
13
13
—
28
—

i.e. 3+3+3+3+3+3+3= 21 and 21+1+1+1+1+1+ 1+1=28

So this checks out. He then says, “Yes, it’s correct. But I can also call my close friend and Finance man Banta Singh.

Banta Singh arrives, and when told of the problem, he replies that he doesn’t think it is a bad deal but says, “No problem! I will verify it via mathematical computation. I’ll verify it with multiplication. That is the best technique for this, you see!” While others watch in admiration, Banta Singh goes on to write as shown:

13
x7
— (7*3=21 ,7*1=7; so
21+7=28)
21
+ 7
—
28
—

This checks out as well. Then he says, “This is really fine. There should be no problem, President Sahab. After all, it is correct in all the methods.”

**-000-**

## SEVEN WONDERS OF THE WORLD

***Ramakant M vidwans, MahIm***
***(Phone 24305260)***

A group of students were asked to list what they thought were the present Seven Wonders of the World.

Though there was some disagreement, the following got the most votes:

1. Egypt’s Great Pyramids
2. Taj Mahal
3. Grand Canyon
4. Panama Canal
5. Empire State Building
6. St. Peter’s Basilica
7. China’s Great Wall

While gathering the votes, the teacher noted that one quiet student hadn’t turned in her paper yet. So she asked the girl if she was having trouble with her list.

The girl replied, “Yes, a little. I couldn’t quite make up my mind because there were so many.”

The teacher said, “Well, tell us what you have, and may be we can help.”

The girl hesitated; then read, “I think the Seven Wonders of the World are:

1. to touch
2. to taste
3. to see
4. to hear
5. to feel
6. to laugh
7. and to love

The room was so quiet you could have heard a pin drop. Those things we overlook as simple and “ordinary” are truly wondrous things in our life that cannot be bought.

**-000-**

## MULTI PURPOSE CARD

Ramakant M vidwans, MahIm
(Phone 24305260)

The multi-purpose card is the latest version of our perpetually metamorphosing IC. With an embedded smart chip, it can also store our medical history, driver's license, act as an ATM card, serve as an electronic purse and even be used at the National Library.

A likely scenario when ordering pizzas in the near future...

Mr.Singh, the customer is ordering Pizzas.

Operator : "Thank you for calling Pizza Hut . May I have your..."

Customer: "Hello, can I order.."

Operator : "Can I have your multi purpose card number first, Sir?"

Customer: "It's eh..., hold on...... 6102049998-45-54610"

Operator : "OK... you're... Mr. Singh and you're calling from 17 Jalan Kayu. Your home number is 40942366, your office 7645 2302 and your mobile is 014 266 2566. Which number are you calling from now Sir?"

"Home! How did you get all my phone numbers?"

Operator : "We are connected to the system Sir"

Customer: "May I order your Seafood Pizza..."

Operator : "That's not a good idea Sir"

Customer: "How come?"

Operator : "According to your medical records, you have high blood pressure and even higher cholesterol level Sir"

Customer: "What?... What do you recommend then?"

Operator : "Try our Low Fat Hokkien Mee Pizza. You'll like it"

Customer: "How do you know for sure?"

Operator : "You borrowed a book entitled "Popular Hokkien Dishes" from the National Library last week Sir"

Customer: "OK I give up... Give me three family size ones then, how much will that cost?"

Operator : "That should be enough for your family of 10, Sir. The total is $49.99"

Customer: "Can I pay by credit card?"

Operator : "I'm afraid you have to pay us cash, Sir. Your credit card is over the limit and you owe your bank $3,720.55 since October last year. That's not including the late payment charges on your housing loan, Sir."

Customer: "I guess I have to run to the neighbourhood ATM and withdraw some cash before your guy arrives"

Operator : "You can't Sir. Based on the records, you've reached your daily limit on machine withdrawal today"

Customer: "Never mind - just send the pizzas, I'll have the cash ready. How long is it gonna take anyway?"

Operator : "About 45 minutes Sir, but if you can't wait you can always come and collect it on your motorcycle..."

Customer: " What!"

Operator : "According to the details in system , you own a Scooter, registration number E1123..."

Customer: " *'!^ *%^**%^I7*"

Operator : "Better watch your language Sir. Remember on 15th July 1987 you were convicted of using abusive language on a policeman...

Customer: [Speechless]

Operator : "Is there anything else Sir?"

Customer: "Nothing... by the way... aren't you giving me that free bottles of cola as advertised?"

Operator : "We normally would Sir, but based on your records you're also diabetic....... "

Mr. Singh faints.

-000-



From:

## maratheparivar @yahoo.co.in

Dear Members,

It is heartening to note that the Hitguj issue No. 68 of December 2006 was generally received well by member-readers. We were flooded with e-mails/letters from various centers. We are thankful to all those who showed interest in joining us in our effort to make Hitguj more informative and attractive to different types of our members.

You are aware that we have our Marathe Kulvritttant published in 1991 having data of over 115 houses(Gharana's) comprising about 900 pages. The limited copies oiriginally printed are already out of stock.

The work of updation is in progress. For this purpose we intend to take advantage of modern tools of information technology.

This huge work can be accomplished with the co-operation of all those who have access to internet and can communicate with us on regular basis.

To begin with we urge you to send us an introductory email stating your full name and address to enable us to locate you in our kulvrittant and build up our **names database.** It will be better if you quote the reference number printed on your mailing lable or just the Kulvrittant page Nc. Eventually we propose to obtain from you complete census of all the members

It is likely that you come across an individual with surname like Marathe, Vidwans, Khambete, Chakradeo, Joshi, Jail and Ratate. It should induce you to find out if he belongs to us-"Marathes". The simplest test is to know from him if he is (1)Kapi gotri and (2) has heard of Marathe Pratishthan.

For further details please visit www.marathepratishthan.org

So, we are eagerly awaiting your e-mails. Bye.

SGKhambete ph:(022)26836994

# नवा अधिक मास

नीलिमा विष्णू विद्वांस (पृ. )माणगांव, जि.रायगड दूरध्वनी-(१५२१४०) २६३५१५

(या वर्षी दि. १७ मे २००७ ते १५ जून २००७ या कालावधीत अधिक ज्येष्ठ मास आहे.अधिक मासाला पुरुषोत्तम मासही म्हणतात . परंपरा थोड़ी दूर ठेऊन नवा विचार रूढ करण्याचा लेखिकेवा प्रयत्न आपणास कसा वाटला ते कळवावे. -संपादक)

एकविसाव्या शतकातील आटपाट नगरात एक पंचकोनी कुटुंब रहात होते. खाऊन पिऊन सुखी होते. मुलांचे योग्य ते लाड केले जात होते. पण कधी तरी न परवडणारे कपडे घ्यावे लागत. कारण मुलांना ते आवडलेले असत. हेतु हाच की आपल्या शिवाय त्यांचे लाड कोण करणार ? आपली कधी हौस झाली नाही. कारण आर्थिक ओढाताण होती. पण मुलांच्या नशिबात असे जिणे नको. त्यांची हौस आपणच पुरवायला हवी. तीच गोष्ट खाण्यापिण्याचीही असे. अधूनमधून गोडधोड आणणे, फळे आणणे असे शक्यतो चालू असे. त्यामुळे मुलेही खूष व आनंदी असत.

सणवारही उत्तम साजरे केले जात असत. सणांचे महत्त्व पटवून मुलांना संस्कारही केले जात होते.जुन्या नव्याचा मध्य साधला जाऊन समारंभही आनंदाने पार पडत. थोडेसे मुलांच्या आवडीने तर थोडे आपल्या आवडीने कार्यक्रम होत असल्याने ते त्यांना जाचक वाटत नसत. म्हणून घरात शांततेबरोबर सुबत्ता नांदत होती. शिवाय हसते खेळते वातावरण असल्याने लक्ष्मीचाही वास असे. परिस्थितीची जाण असल्याने मुले वायफळ खर्च करीत नसत.आपल्या पालकांना इतर लोकांसारखा खर्च करणे परवडत नाहिये . तरिही निव्वळ आपल्या प्रेमाखातर ते आपली हौस मौज करीत आहेत या जाणिवेने ही मुले मोठ्यांचा योग्य तो मान राखून होती. शैक्षणिक वस्तूही स्वतंत्र घेतल्या जात. पुस्तके,वह्या यामध्ये कमतरता नसे. ह्याचे चीज ती मुले करीत होती.
उत्तम गुण मिळवून प्रगति करीत होती. अभ्यासा व्यतिरिक्त खेळ, वक्तृत्व, कला यामध्येही ती बक्षिसे मिळवीत होती. त्यामुळे पालकांना मुलांचा अभिमान वाटत असे. तर मुले स्वतःला असे पालक मिळाल्याने भाग्यवान समजत होती. हे सर्व कुटुंब इतर लोकांसाठी कौतुकाचा विषय ठरत होते. असे त्यांचे संमिश्र बालपण सरत होते.

बघता बघता मुले नोकरीला लागून पगारदार झाली. त्यांचे विवाह झाले. सुनांनी मुलींची जागा घेतली. सर्वांची मने जिंकली. सासुबाई नातवंडांस संस्कारांचे बाळकडू खुषीने पाजीत होत्या. सगळा आनंदी आनंद चालला होता. सगळे खूष होते.

पण वेळकाळ सांगून येत नाही. कालचक्र स्वतःच्या मर्जीनुसार फिरत असते.कधी खूप हसवते तर कधी व्यथित करते. त्याप्रमाणे सुखाला थोडे गालबोट लागले. मातापिताच नव्हे तर सगळे कुटुंब एका बातमीने कष्टी झाले. पण थोडेच दिवस. मग सर्वांनी स्वतःला सावरले. आणि लेकीच्या घरी गेले. जावयांची कंपनी बंद पडली होती. धीर दिला गेला. आर्थिक मदतही केली. पण संकटकाळी न डगमगता त्यातून मार्ग काढण्याचे बाळकडू अंगात भिनल्याने लेकीने मनाची उभारी धरली. खटपट करुन स्वतःला नोकरी मिळवली. पहाटे लवकर उठून, सर्व आवरून डबा घेऊन जाऊ लागली. ती रात्री दमून भागून येत होती. तिची ती ससेहोलपट पतीराजाना पहावत नव्हती. ते खजील होत असत. पण ती त्याना म्हणत असे, इतकी वर्षे तुम्ही कमवत होतात आणि मी मजेत खात होते ना. मग आता थोडे दिवस तुम्ही आराम करा. तुम्हालाही आरामाची गरज असल्यानेच थोडे दिवसांसाठी कंपनीने तुम्हाला सोडचिठ्ठी दिली आहे. पण ती तात्पुरती आहे. ताजेतवाने होऊन तुम्ही नव्या दमाने परत कामाला जा. हा धीर कौतुकाचाच असतो. म्हणून तोही सतत अर्ज पाठविण्याचे काम चालू ठेवतो.

देवावर श्रद्धा तर हवीच. पण त्याचबरोबर सबुरीही हवी. योग आला की सगळे सुरळित होतेच. लेक न कंटाळता सर्व जबाबदाऱ्या पार पाडीत होती.चैनी बंद झाल्या होत्या. इतकेच काय पण आवश्यक गोष्टीनाही फाटा द्यावा लागत होता.एखादे दिवशी सकाळची थंडी गुलाबी वाटते पण मानसिक आजाराला ती अंगाला झोंबणारी बोचरी वाटत होती. रिक्षाने जाणे परवडणारे नसल्याने तिने मनाला बजावले की ही थंडी गुलाबीचआहे. आपण रोज हिचा सुखद अनुभव घ्यायचा. ठरले की अगदी ठामपणे. जणू काळ्या दगडावरची रेघ, न पुसली जाणारी. मग रोजच ती स्टेशनपर्यंत चालत जात होती. एकदा फोनवरून मातेचा प्रश्न, थंडीत रिक्षानेच जातेस ना ? आणि तिचे तत्परतेने उत्तर, छे ग, या सुंदर थंडीचा आस्वाद घेऊन मी ताजीतवानी होते. म्हणून सध्या रिक्षा बंद. फोन ठेवल्यावर मातेचे डोळे पाझरले. ती आईला सहज आणि चातुर्याने फसवीत होती. पण माता खरेच फसेल का ? तिला लेकीचा अभिमान वाटला. वेळ आल्यावर-पुळचटपणा न करता ती करारीपणाने राहाते म्हणून. गोष्ट अगदी क्षुल्लक आहे. पण बरेच काही शिकविणारी आहे. ते दोघेही पडेल चेहऱ्याने न राहता अगदी आनंदी राहून पाहुण्यांचे स्वागतही अगदी उत्तम रितीने करीत होते. त्यांच्या सद्यः परिस्थितीची पाहुण्याना कल्पनाही येणार नाही इतके बेमालूमपणे ते वागत. एरव्ही चार पदार्थ भोजनात असत. पण आता दोनावरच भागविले जात होते. अंदरकी बात अंदरही रहती थी! चालायचेच! सतत सुख भोगले तर दुःख हा शब्दच आपण विसरुन जाऊ, म्हणून विधाता अशा घटना घडवितो. अशा वेळीच आपले कोण परके कोणहे ही समजते. तिच्या सख्या तिला मदतीचा हात पुढे करतात. त्याना ती नम्रतेने नकार देते. कारण त्या आपल्या पाठिशी आहेत. या जाणीवेनेच तिचे मन प्रफुल्लित होते. अशा वेळी आपण कुणावरही न रागावता आपला भोग समजून दिवस परतवायचे असतात. मग देव नक्कीच कृपा करतो. त्यानी घेतलेल्या परीक्षेत आपण प्रथम वर्गात उत्तीर्ण होऊन दाखवायचे असते.

मोठा भाऊ नुसता वयाने किंवा मानाने मोठा न राहता कृतीनेही मोठेपण दाखवीत असतो. जावयांचे वडील राखून ठेवलेल्या पुंजीमधून लेकाला मदत करीत होते. पोटच्या पोराचे दुःख त्यानाही उतारवयात असह्य होत होते. पण ते चेहऱ्यावर न दाखविता त्यांच्यासाठी मार्ग काढीत होते. लेकीच्या मायबापांची अवस्थाही तशीच होती. हा कालखंड सगळ्यानाच विषारी वाटत होता. तो कधी एकदा संपतो याची सगळेच वाट पहात होते. पण योग आला की सगळे काही सुरळित होते हेच खरे. दिवस संथगतीने वाटचाल करीत होते.

अशातच अधिक मास येतो. जावयाला दीपदान करण्यासाठी बाप लेकीकडे जातो. भेट झाल्यावर दोघांचाही आनंद ओसंडून वहातो. लेकीचे आणि बापाचे नाते शब्दांपलिकडचे असते. साठीचे शरीर थोडे कुरबूर करतेच. पण चाळिशीचे मन घेऊन पिता लेकीला भेटीला आलेला असतो. लेकीला पाहून पिता मोठ्या प्रयासाने अश्रू आत परतवितो. पिताच हे करू शकतो. त्याला मातेप्रमाणे मनमोकळे रडण्याचे स्वातंत्र्य नसते. तोंड धुण्याच्या निमित्ताने तो चेहऱ्यावरील अश्रू लपवितो. लेकीला बापाच्या या व्यथेची कल्पनाही येत नव्हती. कारण ती बाबा आल्याचा आनंद लुटीत होती.नंतर चहापाणी गप्पा होतात. तिचे सासरेबुवाही व्याह्यांच्या आगमनाने प्रसन्न होतात. एकसे भले दो अशी अवस्था होते. बाबा मग बाजारात जाण्याचा प्रस्ताव मांडतात. तिघेही जातात. किराणा मालाच्या दुकानात गेल्यावर बाबा मुलीला म्हणतात, "तुला हवे असलेले एक हजार रुपयांपर्यंतचे सामान तू घे". सगळेच पहात राहतात. मग बाबा सांगतात," ही आमच्याकडून अधिक महिन्याची भेट आहे." सगळ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्यकारक भाव उमटतात. सामान घेतलेजाते. सामानाच्या बिलामध्ये हजार रुपयाला पंचवीस रुपये कमी भरतात. पण हजाराचा आकडा पूर्ण झाला पाहिजे असा बाबांचा आग्रह असतो. मग मुलगी तिच्या आवडीचे काजू घेते. मुलगी आणि जावई यांच्या तोंडून शब्दच फुटत नाही. ही नवी पद्धत दुकादारासकट सर्वानाच आवडते. दुकानदारही येईल जाईल त्याला हे सर्व सांगतो. सगळे घरी मजेने परततात. घरी गेल्यावर सासरेबुवांच्या

कानावर ही गोष्ट घातली जाते. त्याना आश्चर्याबरोबर आनंदही होतो. अधिक मासाची ही नवी पद्धत त्यांच्या ह्दयाला भिडते. ते मनापासून व्याह्यांचे कौतुक करतात. जेवणे झाल्यावर शेजारील काही जण गप्पा मारायला येतात. मुलगी त्याना हा किस्सा सांगते. त्यानाही या नव्या पद्धतीचे  कौतुक वाटते. सर्वजण  बाबांचे मनापासून कौतुक करतात. तेव्हा बाबा त्यांना म्हणतात. हे धान्य सामान त्यांना आयुष्यभर पुरणार नाही. पण त्यांचे दीड दोन महिने तरी नक्कीच निभावतील. एक म्हणजे  चांदीचे निरांजन त्यांच्याकडे आहे. आणखी दुसरे एक तर पेटीत जाणार. किंवा कधीतरी त्याचा वापर होणार. पण या वस्तू मात्र रोज वापरात येणार. चांदीचे नीरांजन त्याच्याकडे नसते तर तेही घेऊन दिले असते. पण गरजेच्या वस्तू घेऊन त्यांचा उपयोग झाला तर ते उत्तमच असते. म्हणून  ही नवी रीत घालून दिली. जुनी परंपरा म्हणून त्याच त्याच वस्तू देऊन पैशाचा अपव्यय करू नये. अनारसे मात्र शक्य असल्यास जरूर द्यावे.  कारण तो पदार्थ नेहमी नसतो. त्यामुळे त्याचे अप्रूप वाटते. जुनी परंपरा ही या दानातून साधते. देण्यातला आनंद वेगळाच असतो. अधिक मास म्हणून जावयाला तर द्यावेच पण आपल्या कुवतीनुसार एखाद्या गरजवंताला हवे असलेले देऊन त्याची गरज भागवली तर अधिकच चांगले. कुणाला औषधे, दूध,भाजीपाला, वह्या ,पुस्तके, कपडे इ.गरजेच्या वस्तू देऊन त्याची वेळ निभावता येते. असणाऱ्याना  देण्याएवजी नसणाऱ्याना देण्यात आनंद व पुण्य जास्त असते. शिवाय ती समाजसेवाही होते. हवे  असलेले मिळाल्यावर त्या व्यक्तीच्या डोळ्यात तो आनंद  व्यक्त होतो. तो पाहून आपण सुद्धा खरोखरीचे समाधानी होतो. आपल्या समाधानासाठी तरी हे कार्य जरूर करावे.  इतर प्रकारची मदत करूनही हे समाजकार्य साधता येते. एकाद्याला दवाखान्यात जाण्याचे सामर्थ्य नसेल तर त्याला तिथे घेऊन जाणे, कुणाला दूध,भाजीपाला, औषधे वगैरे आणून देणे. किंवा त्यांच्या गरजेनुसार मदत करून सत्कार्य व पुण्यही प्राप्त करता येते. आणि त्यासाठी अधिक मासाची गरज नसते. अशा कामाला प्रत्येक महिना अधिकच समजावा. अशी वेगवेगळी मदत करून नवीन पायंडा घालावा. असेही नवीन माहात्म्य सांगणारा अधिक मास येऊ  शकतो. इतर नव्या गोष्टींचे आपण स्वागत करतोच ना ? मग अशा नव्या वेगळ्या दानाचेही आपण स्वागत केले पाहिजे. विचारांनी त्यातील सत्य आपलाल नक्कीच कळेल. आणि योग्य वेळी योग्य दान दिल्याने अधिक मास आपल्यावर कृपा करेल व आपले दान सार्थकी लागेल. त्याच प्रमाणे एक वेगळा शब्दप्रयोग वापरून आपण त्याचे महत्त्व वाढवावे. जावयाला अधिक  मासाचे दान असे म्हणण्याऐवजी जावयाला अधिक मासाची भेट हा शब्द छान वाटतो ना ? आपल्या काळजावर धोंडा ठेऊन आपल्या काळजाचा  तुकडा अगोदरच जावयाला दिलेला असतो. हे दान ! आपण हातावर पाणी सोडूनच दिलेले असते. त्या दानानंतर पुढच्या काळात  दिलेले दान न राहता ती प्रेमाची भेट असते. अगदी खरे ना ? हा संदेश सर्वांच्याच मनावर कोरला जातो. सर्वजण हा नवा वसा न टाकण्यासाठी घेऊन आपापल्या घरी जातात. दुसऱ्या दिवशी बापही समाधानाने परतीच्या प्रवासाला निघतो. निरोप घेणे अटळ असल्याने दोघेही जड अंतःकरणाने  एकमेकांचा निरोप घेतात. इथेच ही साठा उत्तरांची कहाणी पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण होते.

-०००-

# मंदोदरीची जन्मकथा

(भावार्थरामायण कथासार वरून)

**सौ प्रतिभा सुधाकर मराठे(पृ.१२१), ठाणे. दूरध्वनी:२५४२०७७१**

कैकसी ही रावणाची माता. ती मोठी शिवभक्त होती. पांच धान्यांच्या पिठाची पिंडी करून ती श्रद्धेने त्याची पूजा करीत असे. शिवाच्या कृपेने आपले रावणादि पुत्र अमर, अजर व अजिंक्य होतील अशी तिची श्रद्धा होती. ती रोज शिवाला बेलाची लाखोली वहात असे. तसेच शिवपूजा होईपर्यंत तोंडात पाणीहि घेत नसे. इंद्राला राक्षसांची फार भीती वाटे रावण जर अजिंक्य झाला तर आपल्या स्थानाला धोका निर्माण होईल म्हणून पूजेत विघ्न आणण्यासाठी इंद्राने एक दिवस ती ध्यानात असताना शिवलिंग समुद्रात टाकून दिले. पण ते न विरघळता हटकेश्वर नावाने पाताळात पूज्य झाले. लिंग नाहीसे झालेले पाहून कैकेसी घाबरली. तिला तो अपशकून वाटला. रावणाजवळ तिने शोक केला. “तुझा पराक्रम व्यर्थ आहे. माझे शिवलिंग तू सांभाळू शकला नाहीस.” असे म्हणून त्याला डिवचले. रावण म्हणाला,  “माते मला क्षमा कर. मी तुला शिवाचे आत्मलिंग आणून देतो.”

तो शिवाकडे गेला. नमस्कार करून उभा राहिला. शंकर शृंगीच्या  वाद्यवादनात तल्लिन झाला होता.त्यामुळे शिवाचे रावणाकडे लक्षच गेले नाही. आता रावणाने आपले मस्तक तोडून त्याची वीणा व आपल्या आतड्याच्या तारा केल्या. तो अतिशय भक्तीने, तन्मयतेने गाऊ लागला. शंकर प्रसन्न झाला. व त्याने रावणाला दहा मस्तके व वीस हात दिले. नाभीजवळ अमृत ठेवले.  “तुला पुन्हा शिरे येतील ” असा आशीर्वाद दिला.


“ आता तुला काय पाहिजे ते माग ” असे सांगितले. रावणाने स्वतःसाठी पार्वती मागितली व आईसाठी शिवलिंग मागितले. दोन्ही गोष्टी शंकराला द्याव्याच लागल्या कारण तो वचनात बद्ध होता. खांद्यावर पार्वती व हातात शिवलिंग घेऊन रावण लंकेकडे निघाला. पार्वतीने विष्णूचा धावा केला.विष्णूने धर्म नामक ऋषीचे रूप घेतले. कार्तिक स्वामीला आपला शिष्य बनविले व गणेशाला गुराख्याचे रूप दिले. वाटेत रावण भेटला. शिष्याने विचारले  “बरोबर कोण आहे ?”  “पार्वती आहे. शंकराने दिलीय मला,” रावण म्हणाला. शिष्य म्हणाला, “रावणा हे आत्मलिंग खरे आहे पण पार्वती खरी नाही. तुला शंकराने फसविले आहे. आपली पत्नी कोण कुणाला देईल ?” रावण चपापला, त्याने पार्वती कडे पाहिले तो काय ! तिथे अत्यंत कुरूप स्त्री दिसली. रावण म्हणाला, “बरे तुम्ही भेटलात. आता त्या शंकराकडे जाऊन त्याला जाब विचारतो.”

आता पुन्हा रावण शंकराकडे निघाला. ती कुरुप स्त्री गुप्त झाली. इकडे विष्णूने लक्ष्मीच्या उदरावरील उटीपासून एक सुंदर स्त्री निर्माण केली.उदरावरच्या उटीपासून तयार केली म्हणून तिला मंद उदरी मंदोदरी असे तिचे नाव रूढ झाले. ऋषी रूपातल्या विष्णूने रावणाला सांगितले, “पार्वतीला शंकराने आपल्या आसनाखाली लपविले आहे. तिलाच तू मागून घे.” लपविण्याची लीला विष्णूचीच हे सांगायला नकोच. रावण शंकराला म्हणाला, “तुम्ही मला फसविले आहे. आता तुमच्या आसनाखाली लपविलेली स्त्री मला द्या.”  “मी तुला कशाला फसवीन ? तुला जर माझ्या आसनाखालचीच स्त्री हवी असेल तर घेऊन जा.,” शंकर म्हणाले.

शंकराने आसनाखाली असलेल्या स्त्रीला बाहेर बोलाविले व ती रावणाला दिली. ती विष्णूने व लक्ष्मीने निर्मिलेली पार्वती आहे असे समजून रावणाने तिचा स्वीकार केला व तो लंकेकडे निघून गेला.

रूप व गूण घेतलेली लक्ष्मीची प्रतिमा म्हणजेच मंदोदरी होय. अशी ही मंदोदरीची जन्मकथा.

-०००-



# सदस्य-संवाद

सी.गो.खांबेटे, अंधेरी (पृ.६७६) दूरध्वनी-२६८३६९९४

**e-mail : (1) sitaram_khambete@yahoo.com**

**(2) maratheparivar@yahoo.co.in**

(१)

सांगली, दि .४-२-२००७

प्रिय श्री. खांबेटेसाहेब,

आपण मिरज येथे आल्यावेळी हितगुजचे अंक देऊन गेलात. तो वाचल्यावर सदर अंक नवीन संपादकांनी व आपण संपादित केला आहे हे समजले. माझे चिरंजीव विश्वेश यांनी आपणही एपीएस फाँट वापरता असे सांगितले त्यामुळे या अंकावरची प्रतिक्रिया मी ईमेलने पाठविली पण त्याला सदर फाँट पाठवा असे उत्तर आले. मी इमेल या क्षेत्रात नवशिक्या आहे मला हे फाँट पाठविण्याची पद्धत माहीत नाही तसेच विश्वेशलाही माहीत नाही. त्यामुळे त्यावेळी पाठविलेली प्रतिक्रिया सोबत पाठवीत आहे. हितगुजमध्ये सुद्धा वाचकांनी मराठीतून मजकूर पाठवावा व वापरलेला फाँट ॲटॅचमेंट म्हणून पाठवावा असे आवाहन करण्यात आले आहे. तरी असा फाँट कसा पाठवावयाचा याची सूचना मला ईमेलवर पाठविलीत तर बरे होईल. म्हणजे वरचेवर संपर्क साधता येईल.

नवीन संपादकांनी काढलेल्या अंकाची प्रतिक्रिया सोबत दिलीच आहे. यापूर्वीचे संपादक श्री. ल.शं. मराठे ह्यांचे संपादनकौशल्यही वाखाणण्याजोगे होते. त्याचा अनुभव मी घेतला होता. डिसेंबर १९९७ च्या अंकात माझी प्रथम पारितोषिक प्राप्त जीवन धारा कथा प्रसिद्ध केली. जागेच्या अभावी तीत केलेली काटछाट लक्षांतही आली नव्हती. ल.शं. नी प्रथमपासून हितगुजची घडी चांगली बसवली होती. त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याबद्दल सर्व वाचकांकडून अभिनंदन होण्यास ते पात्र आहेत.

हितगुजमध्ये प्रसिद्ध झालेल्या साहित्याची सूची प्रसिद्ध करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. त्यामुळे वाचकाला हितगुजमध्ये आपला सहभाग किती होता ते समजून येते. अंकाची मांडणी श्री. खांबेटे यांनी उत्तम केली आहे. हितगुजच्या पुढील वाटचालीला शुभेच्छा.

<u>email  दिनांक २३-१-०७</u>

“.....नवीन संपादकानी संपादित केलेला हितगुजचा अंक चांगलाच निघाला आहे. संपादक नवीन आहेत असे कोठेही जाणवत नाही. अंकाची अक्षर जुळणी श्री. खांबेटे यानी केली त्यामधे त्यांचे प्रभुत्व दिसून येते. मिरज येथे अत्यंत घाई असताना सुध्दा त्यानी माझे चिरंजीव श्री.विश्वेश यांना बोलावून संगणकावर काम केले.”

विठ्ठल महादेव मराठे (पृ.२३५)सांगली केंद्र

(२)

वरळी, दि. ८-२-२००७

संपादक, हितगुज

आपल्या संपादनाखाली हितगुजचा निघालेला अंक वाचला. अंक समाधानकारक वाटला. हितगुजबाबतीत माझ्या काही सूचना आहेत. आपण त्यावर विचार करावा ही अपेक्षा.

प्रतिष्ठानवृत्त, सभासदवृत्त, अभिनंदन, कौतुक वगैरे प्रतिष्ठानविषयक माहिती अंकाच्या मजकुराच्या मध्ये वा शेवटी असावी. सुरुवातीला छोटं पण सुरेख संपादकीय जरूर असावं. त्यानंतर एकादी मन हेलावणारी कथा, वा कुलबांधवांची मनाला सुखद वा दुःखद स्पर्श करणारी आठवण असावी. हे दोन सुंदर उंबरठे ओलांडल्यावर आपण एखाद्या संस्थेची काहीशी ठोकळेबाज माहिती असलेली पुस्तिका नाही तर छोटं पण मन वेधून घेणारं साहित्य आपली आतुरतेने वाट पहात आहे याची जाणीव वाचकाला निश्चित होईल.

तसेच हितगुजमध्ये काही विशेष सदरे असावीत. जवळपास प्रत्येक अंकात वा आलटून पालटून त्यांचा समावेश असावा.

१. <u>माहेरच्या अंगणात</u>- नवविवाहित वा प्रौढ महिलांच्या हंसविणाऱ्या वा रडविणाऱ्या हृद्य आठवणी (१० ते १५ ओळी).

२. <u>मागे वळून पाहता</u>- सुरुवातीच्या वा त्यानंतरच्या हितगुजच्या अंकातील पुनःपुन्हा वाचावेसे वाटणारे साहित्य.

३. <u>चला उद्योगाचे घरी</u>- प्रथितयश उद्योजकांचे वा उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या बांधवांचे मनोगत (३०-३५ ओळी).

४. <u>मी बोलू का?</u>- कुलबांधवानी विशेषतः तरुण वर्गानी व्यक्त केलेले मतप्रदर्शन, सूचना वा सडेतोड टीका (१५-२० ओळी).

५. निरनिराळ्या शहरातून, गावातून कुलबांधवांनी योजलेले उपक्रम, स्थानिक मेळावे, सामुदायिक सहल, साजरे केलेले सण उत्सव यांची माहिती.

६. आध्यात्मिक, प्रबोधनात्मक लिखाण.

७. आरोग्य, खाद्यपदार्थांची माहिती, प्रवासवर्णन इत्यादि.

-विनायक केशव मराठे (पृ.२०).

***(ह्या दोन्ही ज्येष्ठ लेखकांच्या प्रतिक्रिया आम्हाला प्रेरणादायी व सतत मार्गदर्शक आहेत. विशेषतः व्ही. के हे हितगुजच्या सुरुवातीच्या काळातले संपादकीय कार्यातले जुने जाणते सहकारी-पदाधिकारी या नात्याने त्यांच्या सूचनांचे बरेच महत्त्व आहे, त्याबद्दल धन्यवाद. ईमेलसंबंधी सूचना स्वतंत्रपणे देत आहोत.- संपादक***

(३)

कळवा-ठाणे, दि. २६-११-२००६

संपादक, हितगुज

मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सभा रविवार दि. २६-१०-०६ रोजी दामले योग केंद्र, माहिम येथे झाली. सभेमध्ये विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी सदस्य,व कायम निमंत्रितांचीच उपस्थिती प्रामुख्याने दिसली. आजीव सदस्य १३६८ एवढी मोठी व हितगुज तहहयात वर्गणीदार संख्या १०४३ वर असूनही त्यांची उपस्थिती नगण्यच दिसली.ज्या मुलांना बक्षिसे मिळणार होती त्यापैकी पुष्कळशी मुलेही आली नव्हती. यावरुन एकच गोष्ट जाणवली की एखाद्या संस्थेचे सभासद असणे यातच व्यक्तीला अभिमान वाटतो. त्या संस्थेच्या दैनंदिन कार्यक्रमामध्ये सहभागी होणे अशक्य असले तरी विशेष सभा ,संमेलने, मेळावे याना अधिकाधिक सभासदानी उपस्थित राहाणे गरजेचे आहे. हितगुजमध्ये वृत्तांत कळतो म्हणून सभासदानी समाधान न मानता आपल्या घरचेच कार्य आहे असे समजणे योग्य ठरते.आपणाला जाणे अशक्यच असेल तर तसे कळविणे उपयुक्त ठरते. त्यामुळे आयोजकाना येणाऱ्या सदस्यांच्या बसण्याची चहापानाची व्यवस्था करणे सुलभ होते. तरी प्रत्येक कार्यक्रमाच्या/सभेच्या ठिकाणच्या जवळ राहाणाऱ्या सभासदानी तरी आपली उपस्थिती अशा वेळी हमखास राहील याची अवश्य काळजी घ्यावी.

चिंतामण त्र्यंबक मराठे, कळवा-ठाणे(पृ.२४८)

***(आपण व्यक्त केलेली खंत योग्यच आहे. वार्षिक सभाच काय अन्य प्रासंगिक कार्यक्रमाना सुद्धा उपस्थिति वाढावी यासाठी विविध प्रयत्न होतच असतात-कार्यक्रमस्थळ बदलणे, विभागानुसार मेळावे घेणे, स्थानिक पातळीवरील आयोजनांसाठी प्रयत्न करणे इ. आपल्या सूचनेचा परिणाम म्हणून यावर्षीच्या वार्षिक सभेला उपस्थिती सुधारेल अशी अपेक्षा करूया! -संपादक)***

(४)

अंधेरी, दि. ४-३-२००७

संपादक, हितगुज

आपल्या हितगुज या ‘मराठे प्रतिष्ठान, मंबई’ यांच्या मुखपत्राचा डिसेंबर २००६ चा अंक वाचावयास मिळाला.

या अंकातील सर्वच मांडणी सुबक आहे.व सर्वच मजकूर वाचनीय आहे. त्यांतही Famous Quotes व You have no mail, Good! (श्री.रमाकांत विद्वांस),‘ मी जावई मराठ्यांचा’(डॉ. गिरिश जाखोटिया) व ‘चला चला चित्रकूटला’ (श्री.मोहन सदाशिव मराठे) व हंसरे हितगुज (श्री. गजानन भास्कर मराठे) यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. मात्र ‘अखंड भारत’ हा श्री अजित लक्ष्मण

मराठे यांचा लेख अति महत्त्वाकांक्षी वाटला. एकूण अंकाचे संपादन चांगले आहे.

मात्र मी हे पत्र मुख्यतः या अंकातील माझ्या 'संस्कृत गीतरामायणा'चा परिचय करून देणाऱ्या लेखाच्या संदर्भात लिहीत आहे. श्री. सी. गो. खांबेटे यानी या पुस्तकाचा सुरेख परिचय करून दिला आहे, यात वाद नाही. श्री खांबेटे यांचे या पुस्तकाबाबत 'संगणकीय अक्षर-जुळणी' एवढेच योगदान नाही तर हा अनुवाद हरप्रकारे प्रकाशात यावा यासाठी त्यानी सातत्याने माझी पाठच धरली आहे. त्यांचा लकडा व परोपरीची मदत नसती तर हा अनुवाद केवळ माझ्या 'स्वान्तःसुखा' पुरताच सीमित राहिला असता. या श्री. खांबेटे यांच्या पाठपुराव्याबद्दल यथायोग्य आभार मानण्यास पुरेसे शब्द माझेजवळ नाहीत. या श्री. खांबेटे यांच्या 'परहितकारणाचा' अनुभव अनेक 'मराठे' मंडळींनाही आला असेलच.

(प्रा.)सी.भा.दातार, दूरध्वनी-२६८४०३४१

***(याच पत्रात प्रा. दातारानी ते मराठे नसूनही त्यांच्या अनुवादाचा परिचय 'मराठे' मुखपत्रात आला याबद्दल कुतूहल व्यक्त केले आहे. दातारांच्या पुस्तकाशी त्यांनीच मान्य केल्याप्रमाणे असलेल्या 'खांबेटे-(मराठे )' यांच्या विशेष सहयोगामुळे अशा प्रकारचा अपवाद करूनही दातारांच्या या विशेष कार्याची ओळख मराठे बांधवांना करून देणे हे औचित्यपूर्णच नाही काय?-संपादक)***

(५)

घाटकोपर,दि.२५-०२-२००७

संपादक, हितगुज

**हितगुज ६८ वा अंक**

हितगुजचा हा अंक वाचनीय, वैशिट्यपूर्ण व विविधतेने नटलेला आहे.

हितगुजमध्ये आतार्यंत कविता पार थोड्या येत असत. डॉ. सीमा श्याम ह्यांच्या दोन कविता छान आहेत. सभासदांनी यापुढे कविता पाठवाव्यात. इंग्रजी मीडियममुळे सध्याची विद्यार्थी पिढी इंग्रजीतून पूर्वीच्या मानाने सहज लिखाण करु शकतात. दर अंकात दोन पाने इंग्रजीकरता देण्याच्या बेतामुळे तरुण वर्गाचा सहभाग वाढेल असे वाटते.

मराठे मंडळींची मुले, मुली परदेशात स्थाईक झाली आहेत. त्यामुळे त्यांच्या आई वडिलांचे सुद्धा अधुनमधुन जाणे होते. पर्यटना करता सुद्धा बरेच जण सिंगापूर मलेशिया, ऑस्ट्रेलिया, वगैरे ठिकाणी जातात. त्यानी त्यांचे अनुभव प्रसिद्धीसाठी हितगुजकडे इंग्रजी-मराठीत लिहून किंवा ई-मेलने पाठवले तर ते नक्कीच मनोरंजक व उद्बोधक ठरतील.

हंसरे हितगुज या सदरात आपण बऱ्याच वेळा माझे लिखाण प्रसिद्ध करता. विविध क्षेत्रातील मराठे मंडळींनी आपले हलकेफुलके अनुभव पाविले तर हे सदर बहारदार होईल.

'मी जांवई मराठ्यांचा' हा लेख वाचून मला प्रतिष्ठानचे संस्थापक कै. सुरेशभाऊ मराठे यांची आठवण होते.. मराठे मंडळींनी धंद्यात पडावे म्हणून त्यांची तळमळ असे व त्याकरता ते मेळावे घेत, तसेच हितगुजमध्येहीआवाहन करीत असत. डॉ. जाखोटियांचा लेख महाराष्ट्रियन माणूस हुशार, कर्तृत्ववान असूनही काही अंगभूत दोषांमुळे का मागे पडतो ह्याच्यावर प्रकाश टाकतो.

सौ.मंगला मराठे यांचा 'विवाहपूर्व मार्गदर्शन' हा लेख वैशिट्यपूर्ण आहे. घटस्फोटाचे मध्यमवर्गात सुद्धा वाढते प्रमाण बघता अशा लेखांची काळाची गरज आहे.

इतर लेखही छान आहेत. हितगुज अधिक जोमाने पुढील वाटचाल करील अशी आशा आहे.

गजानन भास्कर मराठे (पृ.४२७)

(७)

माणगांव-रायगड दि.२०-१२-२००६

संपादक, हितगुज

मी हितगुजची नियमित वाचक आहे. हितगुजमधून विविध माहितीपर लेख तसेच कुलबांधवांचे अनुभव आपण नियमित प्रकाशित करत असतो. माझ्या कुटुंबातील एक अभिनव अनुभव-वर्तमानकाळात जुन्या चालीरिती त्यातल्या भावनाना फाटा न देता कशा प्रकारे बदलाव्यात हे दर्शविणारा-हल्लीच्या काळात जुन्या चालीरिती त्यातल्या भावनाना फाटा न देता कशा प्रकारे बदलाव्यात-हितगुजमध्ये प्रकाशित करून इतरानी त्यापासून बोध घ्यावा असे मला वाटते.

सौ.नीलिमा विष्णू विद्वांस(फोन-०२१४९-२६३५१५)

***(सौ.नीलिमा यांचा नवा अधिक मास हा लेख अन्यत्र छापला आहे तो अनुकरणीय आहे-संपादक)***

(८)

पुणे दि. १५-२-२००७

संपादक, हितगुज

**विषयः कै. चिंतामण ब. मराठे स्मृति हस्ताक्षर स्पर्धा**

या स्पर्धेत एकूण १४ स्पर्धकांनी भाग घेतला. हस्ताक्षर स्पर्धेचे नियम जाहीर केले होते. त्यांचे बहुतेकांनी पालन केले नाही. बक्षिसाकरिता योग्य असूनही परीक्षकांनी त्यांचा विचार केला नाही. स्पर्धकांनी काळ्या शाईने लिहिणे आवश्यक होते. तसेच आपला वयोगट आणि जन्मतारीख कळविणे बंधनकारक होते. त्यामुळे एकूण १४ पैकी काळ्या शाईने लिहिलेल्या जन्मतारखेचा उल्लेख असलेल्या ७ स्पर्धकांचा विचार करूनच परीक्षकानी निकाल जाहीर केला आहे *(हा निकाल पृ.१ वर छापला आहे-संपादक)* विजेत्या स्पर्धकांना त्यांच्या पोरितोषिकाची रक्कम दि.१५-३-२००७ पूर्वी त्यांच्या पत्यावर पाठविली जाईल. विजयी स्पर्धकांचे अभिनंदन! -गजानन चिंतामण मराठे(पृ.१२९)

(९)

पुणे. दि. २६-१२-२००६

संपादक, हितगुज

**गौरवपत्राला उत्तर**

२५ डिसेंबर २००६ रोजी मराठे प्रतिष्ठाचा२७ वा वर्धापन दिन व प्रतिष्ठान डायरी २००७ चा प्रकाशन समारंभ एकत्रितपणे साजरे करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मुंबईहून कार्यकारिणीचे अनेक सदस्य जातीने उपस्थित होते याचा खूप आनंद झाला.

या कार्यक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. आनंद यशवंत मराठे यांच्या हस्ते मला गौरवपत्र देण्यात आले. याबद्दल मी आभारी आहे. हे सुंदर फ्रेम केलेले पत्र मला दिले असले तरी मी हे पत्र माझे एकटीसाठी नसून पुणे शाखेला मिळाले आहे असे मानते. कारण पुणे शाखेतर्फे वर्धापन दिन, डायरी, वेबसाईट, वधूवर मंडळ असे अनेक उपक्रम राबविले जातात. या योजना पूर्णत्वाला नेण्यासाठी पुण्यातील अनेक कुलबांधवांचे सहकार्य मला नेहमीच मिळते. यासाठी हे गौरवपत्र पुणे शाखेचे आहे.

माझ्यातर्फे व पुणे शाखेतर्फे मराठे प्रतिष्ठानला मनापासून धन्यवाद !

सौ. नीलांबरी मराठे.(पृ.२८०)

२८ फेब्रुवारी २००७

प्रिय सदस्य बंधू-भगिनीनो,

सप्रेम नमस्कार.

आपल्या पत्रांच्या, दूरध्वनींच्या व ईमेलच्या वर्षावाने आम्ही अक्षरशः भारावून गेलो आहोत. आपणाकडून मिळणारे सहकार्य, साहित्य, सूचना यामुळे आम्हाला हितगुज या संपर्क माध्यमाच्या ताकदीचा प्रत्यय येत आहे. त्यामुळेच नवनवीन प्रयोग,उपक्रम सुरू करण्यासाठी आम्हाला सतत प्रोत्साहन मिळत आहे.

संपादन कार्यासाठीसुद्धा दूरवरून सहकार्य करता येते हे पुण्याच्या सुषमा चंद्रशेखर मराठे (पृ.१२८) यानी कुलवृत्तांताची काही पाने नमुन्यादाखल डीटीपी करून ईमेलने पाठवून व गोरेगांवच्या सौ. मंगला मराठे(पृ.३६१) यांनी हितगुज मजकुराचा काही भाग स्वतःहून घेऊन पूर्ण करून ईमेलने दिल्यामुळे प्रत्ययास आले. याशिवाय त्यानी तसेच वरळीच्या विनायक केशव मराठे(पृ.२०)म्हणजे आपले व्ही.के., जोगेश्वरीच्या वा.ग. मराठे (पृ.५०३)या व अन्य अनेकांच्या बहुमोल सूचनांचा खूपच उपयोग झाला. या सर्वांच्या सक्रिय सहकार्यातून हा मार्च२००७ चा हितगुज सिद्ध झाला आहे. आपल्या प्रतिक्रिया,सूचना, सहकार्याचे स्वरूप व्यक्त करणारी पत्रे (फक्त "खुषीपत्रे"नकोत!) पाठवायला विसरू नका.

आणि हो! जरा जाहिरातीसाठीसुद्धा आवाहनाची वाट न पाहता आपला देकार पुढे करा.

*(सी.गो.खांबेटे-सहाय्यक संपादक हितगुज)*

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने-*(पृ. १ वरून)*

# आरोपीच्या पिंजऱ्यात ह.मो.मराठे!

-सीताराम गो. खांबेटे (पृ.६७६), अंधेरी. **(दूरध्वनी-२६८३६९९४)**

*(नागपूरला नुकतेच पार पडलेले ८०वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बऱ्याच अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरले याबद्दलचा उणाअधिक वृत्तांत बहुतेकांच्या वाचनात आला असेलच. या लेखातील ' ह.मो.' यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून जाहीरपणे तर मुखपृष्ठावरील 'वा. ग.' यांना मूकपणे 'लक्ष्य' केले गेले हेही 'मराठे' संदर्भातील एक वैशिष्ट्यच म्हणता येईल.या संमेलनाला मुंबईहून अंधेरीचे सीताराम गोपाळ खांबेटे (पृ. ६७६), जोगेश्वरीचे वामन गणेश मराठे (पृ. ५०३) व ठाण्याचे प्रमोद कृष्ण मराठे (पृ.३७६) हे तीन कार्यकारिणी सदस्य व बांबर-गोव्याचे धडाडीचे कार्यकर्ते वामन रामचंद्र मराठे (पृ. ५३७) केवळ योगायोगाने एकाच गाडीने (विदर्भ एक्स्प्रेस) जाता येता एकत्र होते हेही एक आगळेणच म्हणावे काय ?- संपादक)*

साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी ज्येष्ठ पत्रकार, कादंबरीकार 'ह. मो.' मराठे यांना 'अभिरूप न्यायालया'त खेचण्यात आले. यावेळी डागण्यात आलेल्या प्रश्नांच्या फैरींना त्यांनी कुठे तडक तर कुठे शिताफीने उत्तरे दिली. आणि कुठे धरसोडपणा करून विषयाला बगलही दिली.

चिटणवीस सेंटरच्या मुख्य मंडपात चाललेल्या या खटल्यात वकीलद्वय ' लोकसत्ता-नागपूर ' चे निवासी संपादक प्रवीण बर्दापूरकर तसेच सुधीर गाडगीळ यांनी मराठे यांच्यावर प्रश्नांचा चौफेर मारा केला. 'न्यायाधीश ' मदन धनकर यांच्या न्यायालयात हा खटला चालला.

"राजकारण्यांच्या भूमिकेमुळे समाजात विद्वेषाचे वातावरण पसरले असून त्याचाच परिणाम म्हणून ब्राह्मणांवर अकारण हल्ले होत आहेत" अशी स्पष्ट बाजू मांडून ह. मो. यांनी आयुष्यात वेळोवेळी घेतलेल्या भूमिकांचे समर्थन केले.

'विशिष्ट जातीच्या नेतृत्वाचा झेंडा पुढे नेता काय ? ', या प्रश्नावर 'ह.मो.' म्हणाले,

"माझा पिंड राजकारणाचा नाही. माझ्यात नेतृत्वगुणही नाहीत. राजकारणासाठी पैसा लागतो तोही माझ्याकडे नाही. ब्राह्मणांवर अकारण हल्ले होतात म्हणून 'ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार ?' हे पुस्तक लिहिले. त्यात दोष माझा नाही. बदललेल्या वातावरणाचा आहे. मागे पुण्यातही काही मंडळींनी ब्राह्मणांवर हल्ला केला. राजकारण्यांची धोरणे सुद्धा याला कारणीभूत आहेत. जातवार आरक्षणाने जातींचे पुनरुज्जीवन झाले आहे. अजून १०० वर्षे तरी जाती जाणार नाहीत. पण निदान विद्वेषाचे वातावरण नको. " 'ह.मो.'च्या या आवाहनानंतरच्या एका आरोपाला उत्तर देताना ते म्हणतात,

"पत्रकारांमध्ये साहित्यिक म्हणून तर साहित्यिकांमध्ये पत्रकार म्हणून मिरवतो हा असा आरोप खरा आहे. कारण या दोन्ही बाजूंचे लोक मला स्वीकारत नाहीत! पत्रकारांमध्ये गेलो की ते दूर लोटतात. आणि साहित्यिकांमध्ये गेलो तरी तसेच होते. मी काय करणार ? "असा प्रतिप्रश्नही त्यांनी यावेळी केला.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या संदर्भातील एका प्रश्नाला उत्तर देताना 'ह मो' ना हुषारीचा उपयोग केला आहे.

"बाळासाहेबांचे नाव वापरून साहित्यिक दहशतवाद निर्माण केला हा आरोपही चुकीचा आहे. पण ही आयडिया चांगली आहे. त्यातून बराच स्वार्थ साधता येईल " असे एका प्रश्नावर मिश्किल उत्तर देत त्यांनी उपस्थितांमध्ये हंशा पिकवला.

"मासिकाच्या मालकांनी जबाबदार संपादक म्हणून तुमच्यावर विश्वास टाकला. पण थोडा जास्त पैसा मिळाला म्हणून तुम्ही नोकऱ्या सोडल्या. तुम्ही बेजबाबदार पत्रकार आहात ", या आक्षेपावर ते म्हणाले,

"मालकाशी काही मुद्यांवरून पटले नाही तर त्याने काढण्याआधी आपण राजीनामा देणे योग्य, असे माझे मत आहे. अशा वेळी केवळ जास्त पगाराच्या नोकरीसाठी आधीची नोकरी सोडली असे नव्हे तर प्रसंगी बेकारीसुद्धा पत्करली. केवळ संपादकानेच जबाबदार असावे, असे नाही तर मालकानेही तितकेच जबाबदार असले पाहिजे," असा बिनतोड युक्तीवादही ह.मो.नी पुढे करून वेळ मारून नेली.

"परदेशी लेखकांची चोरी तुम्ही केलेली दिसत नाही. तेवढी विश्वव्यापकता तुमच्यात नाही काय ?," वकील महाशयांचा टोकदार प्रश्न.

"हा आरोप अगदी मान्य आहे. कारण मला इंग्रजी येतच नाही!" असे तडक उत्तर देऊन त्यांनी प्रश्नकर्त्याच्या उपहासातील हवाच काढून टाकली. त्यांच्या साहित्यिक कामगिरी संदर्भातील प्रश्नावर ह मो गंभीर होतात;

"वृत्तपत्रीय लेखनामुळे स्वतःतील साहित्यिकावर अन्याय झाला असे वाटत नाही. उलट वृत्तपत्रीय लेखनापेक्षा साहित्यिक लेखन अधिक केले आहे. अनेक कथा-कादंबऱ्या लिहिल्या आहेत."

"गाजण्याची हौस आहे किंवा चर्चाविषय व्हावा म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न करतो किंवा असाहित्यिक लेखन करतो " हा आरोपही त्यांनी अमान्य केला. उत्तरादाखल त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न "असाहित्यिक लेखन केले असते तर विद्यापीठात माझे साहित्य अभ्यासाला कसे आले असते ? "

" 'नो सेंटिमेंट्स प्लीज' या पुस्तकात, मित्राकडून बायकोला गर्भधारणा होते हा विषय घेतला आहे. माणसातल्या लैंगिक वगैरे भावनांचे तार्किक विश्लेषण करता येत नाही हा या कथानकाचा गाभा आहे. कुटुंब व्यवस्था मोडकळीस आणण्याचा प्रश्नच नाही. हा विषयच वेगळा आहे. "

" मी कार्पोरेट वर्ल्डवर लिहितो किंवा मारामाऱ्यांवर भर देतो, हा फार ढोबळ अर्थ झाला. औद्योगिकीकरणाचे सामाजिक-कौटुंबिक जीवनावर होणारे परिणाम, ही खरी थीम आहे. कारखान्याच्या परिसरातील मनुष्य जीवनाचे अनेक स्तर व त्यांचे वेगळे संबंध, तंत्रवैज्ञानिक प्रगतीचे मानवी जीवनावरील परिणाम ही माझ्या लेखनामागची प्रेरणा आहे ते म्हणाले. आत्मचरित्रातून कोकणातील गरिबीचे चित्रण करून पैसा कमावणे असा हेतू मुळीच हेतू नव्हता. माझे व बहुतांश कोकणी लेखकांचे बालपण गरिबीतच गेले आहे. मी थोडे अधिक दारिद्र्य भोगले आहे. ते 'बालकांडा'त आले. मुद्दाम गरिबीचे भांडवल केले नाही. शिवाय प्रत्येक गोष्ट पैसा मिळवण्यासाठीच केली हे सुद्धा चुकीचे आहे, असेही ते म्हणाले.या प्रश्नोत्तरांनंतर न्यायाधीश मदन धनकर यांनी निकाल दिला. मराठे यांनी सर्वच प्रश्नांच्या उत्तरात युक्तिवाद कौशल्य पणाला लावले. त्यांची कामगिरी लक्षणीयच आहे. पण धरसोडपणा केवळ पोट भरण्यासाठी केला हे त्यांनी मान्य केले. लोकांचा बुद्धिभेदही केला. स्वतःचे समर्थन करण्याची उच्च दर्जाची क्षमता त्यांनी दाखवली. या दोषाबद्दल त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावतो पण लेखन मात्र त्यांनी सुरूच ठेवले पाहिजे, असा आदेश न्यायाधीशांनी दिला.

प्रारंभी प्रा.रवीन्द्र शोभणे यांनी 'ह.मो.'ना त्यांच्या 'बालकांड' या आत्मचरित्रावर हात ठेवून शपथ दिली.या कार्यक्रमाला श्रोत्यांची प्रचंड गर्दी जमली होती. -०००-

***(संपादकीय- पृ. १ वरून )*** साधारणपणे आज ज्या कुलभगिनी साठीच्या पलिकडे गेलेल्या आहेत, त्यांच्या पिढीकडे सांगण्यासारखे खूप अनुभव असतात. आणि त्यानी घरासाठी म्हणा, नवऱ्यासाठी म्हणा, मुलांसाठी, एकूणच साऱ्या कुटुंबासाठी, खूप काही सोसले असते, काही गोष्टींचा त्याग केलेला असतो, स्वतःच्या आवडीनिवडी खुंटीला बांधून ठेवलेल्या असतात. अशा माताभगिनींनी आपले मनोगत मोकळेपणाने लिहून पाठवावे. हितगुजच्या माध्यमातून हे अनुभव प्रकाशित झाल्यास आजच्या मधल्या वयाच्या प्रौढ स्त्रियांना तसेच युवतींना ते वाचावयास निश्चितच आवडतील. यासाठी '**माहेरच्या अंगणात**' हे नवीन सदर सुरु करीत आहे. यात विवाहित, अविवाहित, तरुण-प्रौढ तसेच वृद्ध कुलभगिनींनी माहेरच्या हृदयस्पर्शी आठवणी लिहून पोष्टाने, कुरियरने किंवा ई-मेलने मुखपृष्ठावरील पत्त्यावर पाठवाव्यात.

डॉ. सौ.सुमेधा प्रभाकर मराठे -संपादिका.

-०००-

# कलेकलेने वाढणारी कला

विठ्ठल महादेव मराठे (पृ. २३५), सांगली . दूरध्वनी-0233-2300072

पंचवीस -तीस वर्षापूर्वीची गोष्ट. आमच्या शेजारच्या जेमतेम पस्तीस टक्के गुण मिळविणाऱ्या एका मुलाला जिल्हा परिषदेमध्ये लिपिकाच्या पदावर नोकरी लागली होती. त्याबद्दल त्याने दिलेले पेढे खात असतानाच या मुलाला हे कसे काय जमले याचा विचार मनातून जाईना. माझी ही शंका ऑफिसमधील सहकाऱ्यांसमोर व्यक्त केली तेंव्हा ते म्हणाले, " न जमायला काय झाले? त्याचा बाप गेले दोन महिने झेड.पी.त भोक पाडण्याचा प्रयत्न करीत होता. त्यात त्याला यश आले इतकेच!" त्या मुलाच्या बापाने कुठूनतरी झेड.पी. त वशिला लावला हे माझ्या लक्षात आले. वशिला लावणे या अर्थी 'भोक पाडणे 'हा शब्द त्या काळी रूढ होता. वशिला लावणे याचा अर्थ सरळ सरळ एखाद्या कामासाठी शब्द टाकणे इतका साधा असावयाचा! भोक पाडणे ही त्यातल्या त्यात अवघड कला होती. तीत योग्य जागी, योग्य दिशेने प्रयत्न व्हायला हवे असत.

हा शब्द रूढ होण्याच्या अगोदर म्हणजे स्वातंत्र्यानंतरच्या लगेचच्या काही वर्षात वशिला लावण्यासाठी फार मोठे कष्ट पडत नसत. एखाद्या आमदाराची, सभापतीची त्याच्या लेटरहेडवरची शिफारस असली की पुरे होत असे. अशा लेटरहेडस्ना त्या काळी किंमत होती. त्यांचा उपमर्द करण्याची कोणाची हिंमत नसे! अशी शिफारस करणाऱ्याची त्याबाबत विशेष अपेक्षा नसे. एखाद्याचे काम केले हे त्याने लक्षात ठेवावे इतपतच अपेक्षा असे.

त्यांतर असे काम करणाऱ्यांच्या अपेक्षा वाढू कागल्या. त्यामुळे भोक पाडण्याचे काम कौशल्याचे होऊन बसले. ज्याप्रमाणे लोखंडाला भोक पाडतात त्या ठिकाणी थोडे तेल अगर पाणी टाकीत राहावे लागते त्याप्रमाणे भोक पाडण्याच्या प्रयत्नात आता 'पाकिटा' ची गरज भासू लागली.

अशा बंद पाकिटातून किती तेल घातले ते घालणाऱ्याला व घेणाऱ्यालाच माहित असे. या 'बंद पाकीट' पद्धतीत मध्यस्थाची जरूरी नसे. जेथे भोक पाडायचे आहे त्या माध्यमाचा अंदाज घेत अगर इतरांचा अनुभव लक्षात घेत ही क्रिया पार पडत असे. या 'डायरेक्ट मेथड'मध्ये पाकीट घेणारा, 'हे कशाला', 'याची जरूरी नव्हती' असे तोंडाने म्हणत सवयीने हात मात्र पुढे करीत असे व देणाराही 'राहू दे, राहू दे' असे म्हणत पाकीट सरळ हातात देत असे. अगे ड्रावरमध्ये सरकवीत असे. या डायरेक्ट मेथडमध्ये घेणाऱ्याला पाकिटात अपेक्षित रक्कम आहे की नाही याची व देणाऱ्याला एवढ्या पाकिटाने हे होईल अगर नाही याची शंका असे. पण ते एकमेकांना समजून घेत.

अनोळखी व्यक्तीला थेट पाकीट कसे द्यायचे असा प्रश्न काहीं पडतो. माझ्या एका मित्रावर जेव्हा अशी पाळी आली तेव्हा त्याने आपल्या तज्ज्ञ मित्राचा सल्ला घेतला. मित्र म्हणाला, "त्यात काय अवघड आहे? आता संक्रांत जवळ आली आहे त्यानिमित्त तू पाकीट देऊ शकतोस. अशा वेळी नेहमी जवळ आलेल्या एखाद्या सणाचा आधार घ्यायचा! सणानिमित्त सप्रेम भेट म्हटले की झाले !मित्राने त्याच्या मित्राचा सल्ला मानला व पाकीट देण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. आपल्याकडे सणांना तोटा नाही.त्यामुळे नवीन माणसाला अडचण येत नाही.

जसजसे दिवस जाऊ लागले तशी ही पाकीट मेथड अपुरी पडू लागली. पाकिटात मावून मावून किती रक्कम मावणार? पाकीट अपुरे पडू लागले.त्याची जागा हँडबॅगने घेतली. हँडबॅग म्हणजे हातात सहज मावेल अशी बॅग. चिरिमिरीचे एक पाकीट आधी केबिनच्या बाहेरील शिपायाच्या हातात ठेवून हँडबॅग घेऊन सरळ आत शिरायचे व बॅग सहजपणे साहेबाच्या टेबलावर ठेवून रिकाम्या हाताने बाहेर यायचे! एवढे केले की देणाऱ्याचे काम होत असे.

काही दिवस गेले आणि ही हँडबॅग मेथडही निरुपयोगी ठरू लागली.ज्याप्रमाणे एखाद्या औषधाचा डोस बरेच दिवस घेतल्यावर त्याचा परिणाम होत नाही, त्याची मात्रा वाढवावी लागते त्याप्रमाणे हँडबॅगला पर्याय शोधणे क्रमप्राप्त होते. गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात. त्याप्रमाणे हँडबॅगची जागा सूटकेसने घेतली. लांबी रुंदी जाडी या हँडबॅगच्या मर्यादा सूटकेसला नव्हत्या.ज्या ठिकाणी भोक पाडायचे आहे ते मेध्यम व त्या भोकातून साध्य करायचे ईप्सित याप्रमाणे सूटकेसचा आकार बदलता येत असे. साहेबाच्या बंगल्यावर सूटकेस घेऊन गेलेली गाडी तेथे विसरून परत येऊ लागली.या मेथडची उदाहरणे राजकारणात फार गाजली हे सर्वश्रुतच आहे.

आता ही सूटकेसही अपुरी पडली म्हणतात.आता म्हणे खोका आला आहे. अशी ही काळाप्रमाणे बदलत गेलेली भोक पाडण्याची कला.

आपल्या संस्कृतीत चौसष्ट कलाआहेत असे म्हणतात.त्यात चिठ्ठी, पाकीट, हँडबॅग, सूटकेस अशी कलेकलेने वाढत गेलेल्या पासष्टाव्या कलेची भर पडली आहे असे म्हणायला नको का?

-०००-

# प्रकाशझोत

## पटणी कंप्यूटर सिस्टम्स लि चे एक्झिक्यूटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट सतीश जोशी

प्रेषक: कु. मधुरा प्रभाकर मराठे, वडाळा (पृ.१२०)

सुप्रसिद्ध साहित्यिक कै. द. पां. खांबेटे यांचे भाचे श्री. सतीश महादेव जोशी हे पटनी कंप्यूटर या ख्यातनाम आय. टी. कंपनीचे एक्झिक्यूटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट आहेत. त्यानी कंप्यूटर सायन्स मध्ये एम.टेक केल्यावर व पहिली तीन वर्षे टीआयएफआर मध्ये काम करुन १९८३ मध्ये पटनीमध्ये सॉफ्टवेयर इंजिनियर म्हणून प्रवेश मिळवला. त्यावेळी कंपनीची उलाढाल कमी होती व भर सॉफ्टवेअर ऐवजी हार्डवेअरवर अधिक होता. पण गेल्या २५ वर्षात कंपनीने घेतलेली झेप थक्क करणारी आहे. सध्या कंपनीची वार्षिक उलाढाल रु.२६००कोटीची आहे. भारतात ६ तर अमेरिकेत २० कार्यालये आहेत. इंग्लंड, जपान, ऑस्ट्रेलिया, स्वीडनसह अनेक देशांमध्ये कंपनीचे स्वत:चे सेटप आहेत. जगभर १४००० कर्मचारी कार्यरत आहेत.

बँकिंग,वित्तीय संस्था, टेलिकम्युनिकेशन, मॅन्युफॅक्चरिंग, इ.सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी,पटनी कंपनी विविध सॉफ्टवेअर्स तयार करीत असते.

कंपनीच्या कार्यप्रणालीसंदर्भात बदलत्या बाजारपेठेच्या गरजा सांगताना श्री सतीश जोशी म्हणाले, "आज मी इंजिनियर आहे. आणि फक्त टेक्निकल बाजू सांभाळीन असे म्हणून चालत नाही. तंत्रज्ञानात रोज नव्या गोष्टी घडतात. त्यांचा ट्रेक ठेवावाच लागतो. पण त्यांचा उपयोग व्यावसायिक पद्धतीने करण्याला अधिक महत्त्व आहे. आमच्याकडे इंशुरन्स कंपनी पासून पेसमेकर बनविण्या पर्यंतचा ग्राहक आहे. त्यांचा आणि त्यांच्या स्पर्धक कंपन्यांचाही अभ्यास करावा लागतो. त्यानंतरच त्यांच्यासाठी काम करता येते".

आजच्या तरुणाना ते पुढे असे सांगतात, " काहीतरी करण्यासाठी अमेरिकेतच गेले पाहिजे हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. आपल्या देशातच राहून तुम्ही तुमच्या क्षमता सिद्ध करू शकता. त्याचा अर्थ तुम्ही अल्पसंतुष्ट रहा असा नाही. तुमची दृष्टी विशाल असलीच पाहिजे. ग्लोबल घडामोडींचा आवाका तुम्हाला असायला हवा. पण त्यासाठी देश सोडण्याची अजिबात गरज नाही." -०००-

*(मराठे परिवाराशी संबधित श्री. सतीश जोशी यांचे पटणीसारख्या एका मोठ्या आय टी कंपनीच्या उच्चपदावर असणे ही घटना आपल्याला गौरवाची व प्रेरणादायक आहे. श्री. जोशी यांचा असाच उत्कर्ष होवो व त्यांचे आपल्या तरुणाना मार्गदर्शन लाभो अशी प्रतिष्ठानतर्फे सदिच्छा.-संपादक)*

# श्रीसमर्थ रामदासांची दत्तभक्ती

-डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे(पृ.१२०), वडाळा. दूरध्वनी:२४१५०८८९

येत्या रामनवमीपासून समर्थ रामदासस्वामींच्या जयंतीचे चतु:शताब्दीवर्ष सुरू होत आहे त्या निमित्ताने हा विशेष लेख सादर करीत आहे. महाराष्ट्रात पंढरीच्या पांडुरंगानंतर सर्व थरातून पूजिला जाणारा दुसरा भगवंत म्हणजे श्रीदत्तात्रेयच. या गुरुदत्तात्रेयाची सर्व साधुसंतांनी आत्मीयतेने उपासना केलेली दिसते. याला रामदासही अपवाद नाहीत. श्रीराम आणि मारुती ही त्यांची उपास्य दैवतं आणि श्रद्धास्थानं, असं असलं तरी समर्थ रामदासांनीही श्रीदत्तात्रेयांवर काव्य केले आहे.

समर्थ रामदास म्हणून लोकांमध्ये ते ओळखले जातात. परंतु रामदासांना 'समर्थ' ही पदवी श्रीदत्तात्रेयांकडून प्राप्त झाली, हे फार थोड्या लोकांना माहित असेल. शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी श्रीदत्तात्रेयांनी समर्थ रामदासांना एक बाहेरून काठी पण आतमध्ये धारदार तलवार असलेली अशी काठी दिली होती. सज्जनगडावर आजही ती पहावयला मिळते.

श्रीदत्ताविषयी दृढ श्रद्धा आणि रामदासांच्या मनातील उत्कट दत्तभाव याचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात पहायला मिळते ते कसे याचे दर्शन या अभ्यासपूर्ण लेखातून वाचकांना घडेल.-संपादक

**श्रीसमर्थ रामदास-**

शके १५३०-१६०३(सन १६०८-१६८१)

समर्थांचे विचार आणि व्यक्तिमत्त्व यांच्या मुळे भारावून अनेक लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले आणि समर्थांभोवती शिष्य गोळा झाले. आणि त्यांचा संप्रदाय बनला. शिष्य संप्रदाय वाढत जाऊन अनेक शिष्य स्वतंत्रपणे निरनिराळ्या ठिकाणी राहू लागले तेव्हा समर्थांच्या आपल्या शिकवणुकीचे स्वरूप आणि सार अधिक स्पष्ट होईल असा ग्रंथ लिहिण्याची आवश्यकता वाटली, म्हणून समर्थांनी 'दासबोध' लिहिला. हा ग्रंथ त्यांच्या परिणतप्रज्ञ अवस्थेतील असून प्रामुख्याने वैचारिक आहे. यातील शिकवण मोक्ष मार्गावर उन्नती करणारी जशी आहे तशीच ती जीवन व्यवहार मार्गावर प्रगती करणारी आहे.

रामदासांनी समर्थ संप्रदायाची उभारणी शके १५६६(सन १६४४) मध्ये केली. आणि दासबोध शके १५८५(सन १६६३) मध्ये रचला. या दासबोध रचनेसाठी वापरलेल्या संदर्भग्रंथांची यादी दासबोधात रामदासांनी दिलेली आहे. त्या यादीत दत्तप्रणीत अवधूतगीतेचा समावेश झालेला आढळतो. हे उल्लेख असे:

शिवगीता रामगीता। गुरुगीता गर्भगीता।
उत्तरगीता अवधूतगीता। वेद आणि वेदांत ।।१८।।
दशक १ समास २.

त्याचप्रमाणे-

अवधूतगीता केली। गोरक्षीस निरूपिली।
ते अवधूतगीता बोलिली ज्ञानमार्ग।।३४।। द ७ स ७

समर्थ रामदासानी श्रीदत्तात्रेयांना सिद्ध पुरुष मानून त्यांच्याठायी असलेल्या निस्पृहतेचा उल्लेख दासबोधामध्ये केला आहे. ते म्हणतात:

दत्त गोरक्ष आदि करूनी। सिद्ध भिक्षा मागती जनी।
निस्पृहता भिक्षेपासुनी।प्रकट होये।। द१४ स२ ओ५

समर्थांच्या अध्यात्मिक जडणघडणीत श्रीदत्तात्रेयांचा फार मोठा वाटा असल्याचे दिसून येते. समर्थांना दत्तात्रेयाने कंगाल वेषात दर्शन दिले होते असे 'दासविश्रामधाम' या ग्रंथावरून दिसून येते. हा ग्रंथ आत्माराम कवीने लिहिला आहे. कवी म्हणतात,



येकदा असता संगमाते ।
कंगालवेषे पातला दत्त।
स्नान करोनी जाता मुनिनाथा।
साउली न पडे आंगाची।।८९।।
निर्च्छायेचे मानूनी आश्चर्य।
शुद्धत्त्वे युक्तिने धरिले पाय।
छंदबंद करिता न मानी भय।
मग भेटोन निजांगे बैसले।।९०।।
पुसता दासांनी नामाभिधान।
दत्तात्रय वदती बंधुजन।
त्रयदत्त संज्ञा पुसतां सज्जन।
स्वजन्मकथा कथी मुनी।।९१।।

हा कंगालवेष म्हणजे दरिद्री वेष. मलंग वेष नव्हे. समर्थांचा वेष शाही थाटाचा असे. ह्याच्या विरुद्ध अगदी साधा वेष म्हणजे कंगाल वेष आहे.

**योगमार्गाचा उपदेश**

त्याचप्रमाणे श्रीदत्तात्रेयांनी रामदासांना योगमार्गाचा उपदेश केला होता असेही 'दासविश्राम धामा 'तील उल्लेखांवरून दिसून येते.

जे ठाई उभे दास समर्थ।
तेथेचि श्रीगुरुदेव दत्त।
कमंडळी उदक भरीत।
धरोनि हातें पातले।।९।।
मातापुरनगीं जयाचे शयन।
मणिकर्णिकेमाजी नित्य मज्जन।
करवीरी जयावे भिक्षा भोजन।
जो सिद्धसिद्धांचा मुनिराया।।१०।।
रामदासा देउनी दर्शन।
वोळखी वृत्तांतु सांगूनि पूर्ण।
करवूनिया उदक प्राशन।
नेले अवचटा शिखरावरी।।११२।।
जे सिद्धमुनि योगियां रमकस्थान।
छाया सुसीतष्ट सफलित व्रत।
तीर्थरूप सांचले जेथे जीवन।
विसावोन बोलत बैसले।।११३।।
अत्रिनंदना उपजोनि कृपा।
पुसति वाटले भय तुज बापा।
जी देहभृतया थेट साटोपा।
माजीं न येचि सद्भावा।।११४।।
मम हांसोनिया अनुसूयासुत।
निर्छायादि सांगोनि योगसमस्त।
मणका अमोल्य ईश्वरीदत्त।
पाया स्वहस्ते बांधिला।।११५।।
जया मणीचा ऐसा प्रताप।
न बाधे आंगा शापकोपताप।
भ्रमभये दृष्टीस नपडे अल्प।
संतोषवृत्ती ठसावे।।११६।।
जेवि जनकात्मजा अलंकार।
करूनि अनुसूया वोपी वर।
न सुके न विटे पूजोपचार।
पुनर्दर्शने परियंत।।११७।।
मग स्मरता पावेन हे भाक वोपून।
अवधूत पावला अंतर्धान।



दास निघोनी निर्भयमनें।
पाहात वनस्थान चालिले।।११८।।

### रामदासांना 'समर्थ' ही पदवी श्रीदत्तात्रेयांनीच दिली

श्रीरामदासांचे 'समर्थ' हे नाव श्री दत्तात्रेयांनीच ठेवले त्याची हकीकत 'दासविश्रामधामा'त पुढीलप्रमाणे येते.

आला उछावीं साहित्य करूं।
कीं श्रीहरी सन्निधीं पावला हरू।
तवाचि डुल्लत अनुसूयाकुमरू।
पालटून वयें पातला।।१४।।
बसवण्याप्रति उमाकांत।
हेग्गरसासि नागनाथ।
नामयालागी पंढरीनाथ।
परीक्षू आले जयापरी।।१५।।
ज्यासी अभेदें धरिले ह्रदयी।
त्या वळखुये बदलोनि आले जरी।
जेवि विदित आपले ह्रद्गतजीवी।
तेवि देवभक्त एकचि।।१६।।
संगमी असता दास विरक्त।
कंगालवेषे पावला दत्त।
स्नान करोनि जाता सुपंथे।
साउली न पडे आंगाची।१७।
पवन परी जैसे गोरक्षआंग।
मारुतीरायाचा निर्मळ योग।
पाप निर्लेप देव श्रीरंग।
निर्काया निःसंग शशिबंधु।।१८।
निछेयाचे मानोनि आश्चर्य।
शुद्धत्वयुक्तीने धरिले पाय।
छंदछिन्न दावितां न मनिचे भय।
जैसा फरिद दृढमति।।१९।।
स्तवोनि यापरि तुष्टल्या चित्तें।
सुचिले सर्वही ध्यान योगपंथ।
कितव नाम ठेऊं दासाते।
प्रसन्न वेरासि योजिती।।२३।।
मुनिनाथ मुनीचा हाचि हा प्रेम।
ठेविता न साडो यासि प्रतिनाम।
क्रिया कर्तृत्वी सफलित द्रुम।
व्हावे सद्भक्त विसाऊ।। २४।।
अभिलादिक जनाचा रिती।
वडिला देवाची नामे उपमिती।
सौंदर्यशौर्य क्रिये ना शांति।
प्रत्यक्षविण अशोभा।।२५।।
प्रतिन्नव निर्मळा ना साडो म्हणत।
मग नूतन क्रमाचा शोधूनि अर्थ।
ठेऊनि सप्रेमे नाम समर्थ
जन धन्य प्रसिद्ध हो म्हणे।।३७।।
कथा कीर्तनी संकटात।
हे नामचिंतन करील त्यात।
साह्य होवोनि उर्विजानाथ।
मनोरथातें पुरवील।।३८।।
विनवी दासांनीं आराध्यदैवत।
श्रीराम माझा तोचि समर्थ।
दत्तात्रय वदे निशाणचि न्हाते।
श्रीरामसमर्थ चालवा।।३९।।
परंतु समर्थ नाम हे तुमचे।
जी म्हणे कीजे बिरूद साचे।
म्हणोनि तथास्तु सर्वे तेथेच।
अंतर्धान पावला।।४०।।

### भूपाळी

श्रीसमर्थ रामदासांनी रचिलेली श्री दत्तात्रयावरील भूपाळी प्रसिद्ध आहे. ही भूपाळी गाऊन समर्थ रामदास स्वामी श्रीदत्तात्रेयांना विनम्रपणे जागे करीत आहेत. ही भूपाळी अशीः

उठि उठि बा दत्तात्रेया। भानु करुं पाहे उदया।
करे दीनांवरती दया। चरण दावी वेगेसी।।ध्रु।।
मंद वायूहि सुटला। पक्षी करिताती किल्बिला।
दीपवर्ण शुभ्र झाला।पूर्व दिशाउजळली।।१।।
करूनि कृष्णेचे सुस्नान। घेऊनी पुजेचे सामान।
सगळां लागलें तव ध्यान।कपाट केंव्हां उघडेल।२।
आले देवादिक दर्शना।त्यांच्या पुरवाव्या कामना।
संतोषोनि आपल्या मना।तीर्थप्रसाद अर्पावा।।३।।
गुरू त्रैमूर्ति साचार। करिसी पतितांचा उद्धार।
म्हणुनी धरिसी हा अवतार।संकटी भक्ता रक्षिसी ४
रामदास लागे पायी। मागे इच्छा हेंचि देई।
तूंचि माझी बाप मायी। प्रतिपाळावे भक्तांसी।। ५।।

समर्थ म्हणतात, प्रभात समय जवळ आला आहे, तेंव्हा हे प्रभू तुम्ही जागे होऊन जगदोद्धारासाठी प्रवृत्त व्हा. मंदमंद वारा वहात आहे; पक्षांची किलिल होत असून पूर्व दिशा सुवर्ण प्रकाशाने उजळून निघाली आहे. कृष्णेत सुस्नात होऊन हातात पूजा साहित्य घेऊन ती आपली वाट पहात थांबली आहे. आपल्या मनोकामना पूर्ण करुन घेण्यासाठी देवादिक भक्त आपली उत्कंठेने वाट पहात आहेत. हे त्रैमूर्ति सद्गुरो, भक्तांचे संकटांतून रक्षण करणाऱ्या भक्तवत्सल मायबापा, आपण भक्तांचा प्रतिपाळ करावा. अशी विनंती करून समर्थ रामदास दत्तचरणी लागतात. भूपाळी छोटीशीच असली तरी प्रासादिक असून माधुर्याने विनटली आहे. श्रीसमर्थ रामदासांनी श्रीदत्तात्रेयावर रचिलेली एक आरतीही उपलब्ध आहे. ती अशीः

देहत्रय अवतारा तापत्रय हरिसी।
अक्षयसुख अवदुंबर छात्रे विचरसी।
श्रीकृष्णा तटि राहूनी दासा उद्धरिसी।
जडमूढां ताराया अवतार धरिसी।।१।।
जयजयश्रीदत्तात्रय औदुंबरवासी।
मंगल आरती करितों ममभवभय नाशी।।ध्रु.।।
काय तुझा महिमा वर्णावा आतां।
मारिसि भूतसमंधा सक्रोधे लाथा।
नाना रोग दुरत्यय तव तीर्थ घेता।
पुनरपि श्रवण न ऐकवि गदरिपुची वार्ता।।२।।
तूझें क्षेत्र मनोहर या अवनीवरती।
त्यातें पहातां वाटे स्वर्गासम धरती।
आनंदें द्विज भारत पारायण करिती।
त्रिकाळ सप्रेमाने करिती आरती ।।३।।
मी अधसागर तू हो अगस्तिऋषि देवा।
प्राशुनि वारी दे मज त्वत्पदि त्वा ठेवा।
बाधो ना मज किमपि प्रापंचिक हेवा।
दास म्हणे हे बाळक आपुल्या पदिं ठेवा।।४।।

या आरतीमध्ये समर्थांनी श्रीदत्तात्रेयांचा औदुंबरतळी निवास होत असल्याचा उल्लेख केला आहे. भूतप्रेत पिशाच्च श्रीदत्तात्रेयांसमोर उभे राहू शकत नाहीत असे समर्थ म्हणतात. समर्थांनी औदुंबरक्षेत्रांचा महिमा अप्रत्यक्षपणे कथन केला आहे. या ठिकाणी आज सुद्धा भूतप्रेत पिशाच्चांची झडपणी होत असते! भूतप्रेतसमंध पिशाच्च यांच्यावर दत्तकवच अत्यंत प्रभावी आहे. परंतु नाथसंप्रदायाकडून हा वारसा दत्तसंप्रदायात आलेला दिसतो. अशा रितीने समर्थांनी दत्तात्रेयांच्या सामर्थ्यांचे विशेष वर्णन केले आहे.

दत्तसंप्रदायात अत्यंत महत्त्व असलेल्या गुरुगीतेवर समर्थ रामदासांनी श्री प्राकृत गुरुगीता या नावाची एक टीका केली असून ती प्रसिद्ध झाली आहे. अशा प्रकारे समर्थ रामदासांची दत्तभक्ती त्यांनी केलेल्या काव्यातून प्रकट होतांना दिसते.

-०००-

# गोमन्तक मराठे परिवार संमेलन

## रविवार दि.११-२-२००७

प्रेषक-सौ.शुभदा दीपक मराठे(पृ.५३३) शिरोडा-गोवा
दूरध्वनीः २३०६३७५

रविवार दि. ११ फेब्रुवारी २००७. बारदेश तालुक्यातील पीर्ण हे छोटेसे गांव. श्री.विष्णू पांडुरंग मराठे यांचे निवासस्थान. अंगणात घातलेला छोटासा पण शोभिवंत मांडव. बाजूला बाग. बागेतील सुवासिक फुलांच्या , कुदकळ्यांच्या, सुमधुर वातावरणात सकाळी ठीक ११ वाजता संमेलनाला सुरुवात झाली. निवेदक होते श्री. प्रदीप अनंत.

आजच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या व वक्त्या म्हणून लाभल्या होत्या बेळगांवच्या डॉ. सौ. रमा रविकिरण मराठे. अध्यक्षस्थान श्री कृष्णा काशिनाथ व स्वागताध्यक्षपद यजमान श्री. विष्णू पांडुरंग यानी भूषविले तर उद्घाटक म्हणून नानोड्याचे वेदमूर्ती नारायण रामचंद्र फडके याना निमंत्रित केले होते. आणि विशेष अतिथी होते प्रा. गोपाळ विष्णू केळकर.

सर्व उपस्थित व निमंत्रित मान्यवरांचे श्री. विष्णू पांडुरंग यानी स्वागत केले.कु. पूर्वा, शुभम्, प्रणव या छोट्यांनी सर्वांना गुलाबपुष्पे व पुस्तके दिली. कु. शुभम् हिने गोड आवाजात ईशस्तवन म्हटले. व्यासपीठावरील मान्यवरांचा परिचय सौ.शुभदा दीपक यांनी केला.व दीपप्रज्वलनाने संमेलनाचा शुभारंभ झाला.

उद्घाटक श्री. फडके यांनी आपल्या भाषणात मराठे परिवाराला एकत्र आल्याचे पाहून आनंद व्यक्त केला. कुलबांधवांचा हा सर्वात मोठा परिवार असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी काही सूचना केल्या, त्या अशाः

" केवळ मराठे कुलबंधूंचा उत्कर्ष न पाहता सर्व चित्पावनांचा त्यात अंतर्भाव असावा. गोमन्तक चित्पावन संघाची सचिवपदाची जागा रिक्त आहे ती भरण्यासाठी मराठे परिवारातील इच्छुकांनी पुढे यावे. संमेलन प्रसंगी परिवारांतील वृद्धांचा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व्हावा."

विशेष अतिथी प्रा.श्री. गोपाळ केळकर यांनी केळकर परिवाराची माहिती दिली. त्यात ते दरवर्षी ते एक वर्षभरासाठी संकल्प ठेवतात. व तो कार्यक्रम वर्षभर राबविला जातो. उदा. गायत्री मंत्राचा जास्तीत जास्त जप करणे. केळकर परिवाराच्या सतत सहकार्याचे आश्वासन देऊन त्यानी आपले भाषण संपविले.

तदनंतर संमेलनातील विशेष व प्रमुख वक्त्या डॉ. रमा मराठे पेशाने डॉक्टर असूनही उत्तम लेखिका, कवयित्री व वक्त्या आहेत. आपला पेशा सांभाळताना रुग्णाच्या शरीराबरोबर त्याच्या मनाशी संपर्क साधण्याचा, त्याच्या मनात शिरण्याचा यशस्वी प्रयत्न त्या करतात. या सवयीतूनच त्यानी अनेक पुस्तके लिहिली आहेत- १.रंग सुखाचे, २.हसत जगावे, ३.फूल आणि समिधा, ४.औषधाविना आरोग्य, ५.मनगंगेच्या काठावरती, ६.असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्व, ७.स्वभावाला औषध आहे, ८.हिंदू समाज एकीकरण इ.. औषधाविना आरोग्य या तत्त्वावर त्या हेल्थकेअर आत्मविकास केन्द्र चालवितात, कार्यशाळा घेतात. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा लाभ या संमेलनाच्या निमित्ताने मराठे परिवाराला मिळाला.

त्यांच्या भाषणात ' एकविसाव्या शतकातील वैशिठ्यांची-तंत्रज्ञानाची विलक्षण प्रगती, गरुड भरारी, निसर्गावर विजय, जगाचे जवळ येणे पण माणसे दूर जाणे,महत्त्वाकांक्षी युवक युवतींची जीवघेणी स्पर्धा' इ.गोष्टींची उजळणी करून त्या म्हणाल्या,

" 'अवघे विश्वची माझे घर' मानणारे आम्ही. आमची कुटुंबव्यवस्थाच सध्या मोडकळीस आली आाहे. माणसे एकटी जगायला लागली आहेत. कारण जगण्यासाठी एकत्र येण्याची गरज त्यांना वाटत नाही. जवळीक तर नाहीच नाही. "

गरजेतून जवळीक निर्माण होते हे त्यानी साधी घरगुती उदाहरणे देऊन स्पष्ट केले. आणि ही जवळीक व आपुलकी निर्माण होण्यासाठी आजच्या घडीला अशा घरगुती संमेलनांची आवश्यकता आहे. त्यातून आपुलकीची भावना, ओळख व संघटनशक्य होते. आपण एकटे राहिलो तर नष्ट होऊ हेही त्यानी विविध उदाहरणानी स्पष्ट करून शेवटी 'निसर्ग व मानव', 'प्राणिसंग्रहालयात मी', व 'लक्ष्य लक्ष्य जन्म'या स्वरचित कविता सादर केल्या. भाषणाची सांगता त्यानी आपल्या '२५ व्या शतकात- ऐक कहाणी विज्ञानयुगाची-पंचविसाव्या शतकाची-मानव प्राण्याच्या विजयाची' या आगळ्या वेगळ्या कवितेने केली. अशा रितीने पहिले सत्र संपले. आणि रुचकर अशा भोजनाचा सर्वांनी गप्पा मारत आस्वाद घेतला.

दुसऱ्या सत्राची सुरुवात कु. अपूर्वा हिने सादर केलेल्या छानशा नाट्यछटेने झाली. ठीक ३ वाजता सुरू झालेल्या या सत्रात चर्चेचे विषय होतेः

१. वडदेव देवस्थान, होंडा येथे मराठ्यांनी सभासदत्त्व घेणे
२. गीताजयंती साजरी करण्यासाठी पुढाकार घेणे.
३. चित्पावन ब्राह्मण संघाच्या वास्तूसाठी मदत करणे.
४. पुढील संमेलन सत्तरी विभागात घेण्याबद्दल विचार.

या चर्चासत्राच्या अध्यक्षपदी संमेलनाध्यक्ष श्री. कृष्णा काशिनाथ होते. सूत्रसंचालन सौ. शुभदा दीपक यानी केले.

सर्वप्रथम वडदेव देवस्थानचे सभासदत्त्व घेण्याचे एकमताने ठरले.

त्यानंतर गीताजयंती साजरी करण्यासंबंधी अनेक सदस्यांनी भूमिका मांडली. या संदर्भात आगाशी-वसई येथून खास आलेल्या श्री.ज.गो.मराठे(पृ.४०५) यांनी प्रसारित केलेल्या गीता-गीताईतील निवडक आठ श्लोकांच्या पत्रकानुसार गीता पठणाचा कार्यक्रम घेण्याविषयी सांगोपांग चर्चा झाली. चर्चेअखेर श्री. कृष्णा काशिनाथ यांनी सांगितले की, "या श्लोकांचा प्रसार व प्रचार मोठ्यांपासून लहानापर्यंत व्हावा. मुलांना घडविण्याच्या दृष्टीने मराठे व अन्य कुटुंबियांसाठी हे श्लोक व त्यांचा अर्थ सांगणे या स्वरूपात स्पर्धात्मक कार्यक्रम गोमंतक मराठे परिवाराने आयोजित करावेत." *(सोबत हे श्लोक दिले आहेत.-संपादक)*

चित्पावन ब्राह्मण संघाच्या वास्तूसाठी मदत करण्याविषयी विविध मते व्यक्त करण्यात आली. शेवटी परिवारातर्फे दोन महिन्याच्या अवधीत परिवार सदस्यांकडून प्रत्येकी रु.दोन हजार याप्रमाणे एकत्रित करून ३० एप्रिलच्या रामनवमीच्या मुहूर्तावर चित्पावन संघाला प्रदान करण्याविषयी निर्णय घेण्यात आल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले. या कामासाठी विभागवार रचना आखण्यात आली. त्यानुसार (१) पेडणे-बारदेश-तिसवाडी विभागासाठी पीर्णचे श्री. विष्णू पांडुरंग, (२)डिचोली-साखळीसाठी श्री. मधुकर दिवाकर, (३)सत्तरीसाठी श्री. पुरुषोत्तम परशुराम आणि (४)फोंडा-सांगेसाठी श्री. अरुण शिवराम व दीपक बाळकृष्ण यानी जबाबदारी घेण्याचे ठरविण्यात आले.

यापुढील गोमंतक मराठे संमेलन सत्तरीत घेण्याबाबतचा विचार एकमताने संमत झाला व श्री पुरुषोत्तम परशुराम यांनी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली. मात्र उपस्थिति सुधारण्यासाठी परिवार संपर्काचे बाबतीत अधिक प्रयत्न केले पाहिजेत. नवी सदस्यांचा शोध घेऊन त्याना परिवारात सामील करून घेण्याचे काम नेटाने पुढे नेले पाहिजे. यावर्षी संमेलनाची बातमी वर्तमानपत्रात वाचून शोध घेत आलेल्या मूळच्या वाडे-पडेलच्या, नंतर मध्यप्रदेशात स्थाईक होऊन आता गोव्यात नोकरीसाठी आलेल्या श्री. प्रकाश अच्युत मराठे (पृ. ८७) यांचे विशेष स्वागत करण्यात आले. *(मुंबईहूनही श्री. खांबेटे यानीही त्यांचेशी फोनवर व इ-मेलने संपर्क साधून प्रतिष्ठानशीही नाते जोडले.-संपादक)* अशीच आपुलकी व कळकळ सर्व बांधवांनी दाखवावी अशी अपेक्षा आहे.

संमेलनाच्या समारोपामध्ये अध्यक्षांनी (१)गोव्यात परिवाराची वास्तू,(२)संमेलनासाठी ज्यास्त संख्येने उपस्थिती व (३) व परिवाराची सहकारी सोसायटी असण्याची आशा व्यक्त केली.

शेवटी श्री. अजित लक्ष्मण यानी आभार मानले,श्री.अनिल व कु. ममता जोशीनी पसायदान म्हटले व चहा-बटाटेवड्याचा आस्वाद घेत संमेलनाची सांगता झाली. -ooo-

| गीता | गीताई |
|---|---|
| श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञात् ज्ञानयज्ञःपरंतप । | द्रव्य-यज्ञादिकांहूनि, ज्ञान-यज्ञचि थोर तो |
| सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते।। ४-३३ | पावती सगळी कर्मे, अंती ज्ञानात पूर्णता ४-३३ |
| तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। | सेवा करूनि ते जाण, नम्र भावे पुसूनिया |
| उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।। ४-३४ | ज्ञानोपदेश देतील, ज्ञानी अनुभवी तुज ४-३४ |
| अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्। | हितार्थ बोलणे सत्य, प्रेमाने न खुपेलसे |
| स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते।१७-३५ | स्वाध्याय करणे नित्य, वाणीचे तप बोलिले१७-३५ |
| न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते। | ज्ञानासम नसे काही, पवित्र दुसरे जगी |
| तत्स्वयं योगसंसिद्धःकालेनात्मनि विन्दति। ४-३८ | योग-युक्त यथा-काळी,ते पावे अंतरी स्वये ४-३८ |
| ईश्वरःसर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। | राहिला सर्व भूतांच्या, हृदयी परमेश्वर |
| भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ।। १८-६१ | मायेने चाळवी त्यांस, जणू यंत्रांत घालुनी १८-६१ |
| तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत। | त्यातेचि सर्व-भावे तू, जाई शरण पावसी |
| तत्प्रसादात्परांशान्तिंस्थानंप्राप्स्यसिशाश्वतम्१८-६२ | त्याच्या कृपाबळे थोर,शांतीचे स्थानशाश्वत१८-६२ |
| युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। | निजणे जागणे खाणे, फिरणे आणि कार्यहि |
| युक्तस्वप्नावबोधश्च योगोभवति दुःखहा। ६-१७ | मोजूनि करितो त्यास, योग हा दुःखनाशन ६-१७ |
| तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ। | म्हणूनि आदरी शास्त्र, कार्याकार्य कळावया |
| ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्मकर्तुमिहार्हसि।१६-२४ | शास्त्राचे वाक्य जाणूनी,इथेतू कर्म आचरी१६-२४ |
| *** | *** |

| | |
|---|---|
| हे ध्येयसूत्र श्लोक पाठ करा | गीताई माउली माझी, तिचा मी बाळ नेणता |
| आणि निःशुल्क व आजीव सदस्य व्हा. | पडता, रडता घेई, उचलून कडेवरी -विनोबा |

## गीता वाचन

उच्चार, विचार व आचार सुधारले तर प्रचार आपोआप होईल. पण त्यासाठी केवळ भक्तीभावाने किमान गीतापठण व तिचे स्पष्ट वाचन सर्वाना सहज करता येईल. सोबत अर्थ समजून घेतला की मग तसे वागावे असे वाटेल व आपले वागणे सुधारेल. म्हणून सु-गीतेचे पहिले व महत्त्वाचे पाऊल स्पष्ट व शुद्ध वाचन हे आहे. सोबतचे निवडक श्लोक यासाठी मार्गदर्शक ठरतील.केवळ तत्त्वज्ञानासाठी नाही तर जीवनाच्या लढाईतसुद्धा विजयी होण्यासाठी सुगीता-विचार उपयोगी आहे. पालकांनी योग्य वयात आपल्या मुलांना गीतादुग्धामृत पाजावे व त्यांच्या उत्कर्षाचा मार्ग सुकर करावा ही विनंती" हे कळकळीचे आवाहन ज्येष्ठ गीता प्रचारक श्री.ज.गो. मराठे यांनी सर्वाना केले आहे

वरील गीता श्लोकाष्टक असलेले पत्रक त्यांनी गीता प्रचारासाठी वितरित केले आहे.-सपादक

*(सभासदवृत्त-इंदा सौख्यभरे .पृ ३ वरून)*

**३**.मुलुंडचे श्री.उदय दत्तात्रय मराठे(पृ.३२६)यांची कन्या **चि.अल्पना** हिचा विवाह **शनिवार दि.३०डिसेंबर२००६**रोजी श्री. रामचंद्र कुळकर्णी, यांचा सुपुत्र **चि.समीर** यांचे बरोबर विलेपार्ले येथे पार पडला.

**४**. पुण्याचे श्री. सतीश श्रीपाद मराठे (पृ.५५३) यांची कन्या **चि.सायली** हिचा विवाह गुरुवार दि.**२५-१-२००७** रोजी श्री. माधव श्री. पटवर्धन यांचा सुपुत्र **चि.केदार** यांचे बरोबर पुणे येथे पार पडला.

**५**.नागपूरचे श्री. दत्तात्रय कृष्णाजी मराठे (पृ.३३४ ) यांची कन्या **चि. भारती** हिचा विवाह गुरुवार दि.**२८-९-२००६** रोजी श्री. ओमप्रकाशजी गुप्ता, वाराणसी यांचा सुपुत्र **चि.सौरभ** यांचे बरोबर नागपूर येथे पार पडला.

**६**.पुण्याचे श्री.सुधाकर द. मराठे (पृ.२५२) यांची कन्या **चि.अमृता** हिचा विवाह शुक्रवार दि.**२९-१२-२००६** रोजी श्री. रणजित काशिनाथ दाते यांचा सुपुत्र **चि.मंदार** यांचे बरोबर पुणे येथे पार पडला.

वरील सर्व नवविवाहिताना प्रतिष्ठानच्या शुभेच्छा.

-०००-

# सहवेदना

**१**.डोंबिवली येथील सभासद **मधुसूदन वासुदेव विद्वांस** ( पृ. ६६१) यांना दिनांक १-१०-२००६रोजी वयाच्या ८०व्या वर्षी वृद्धापकाळाने देवाज्ञा झाली. ते घाटकोपरच्या सर्वोदय विद्यालयातून निवृत्त झाले असून ते गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष होते.त्यांच्या मागे पत्नी मालती व दोन कन्या ( मेधा गांगल, पुणे व माधुरी कडेगांवकर, डोंबिवली)असा परिवार आहे.(दै. म.टा. तील निधनवार्तेवरून).

**२**.विलेपार्ले येथील सदस्य **अरविंद श्रीधर विद्वांस** (पृ.६४८) यांचे राहत्या घरी दिनांक १०-९-२००५ रोजी हृदयविकाराने ६९ व्या वर्षी निधन झाले. ते मुंबई महानगरपालिकेतून डे. चीफ ऑडिटर या पदावरून निवृत्त झाले होते. त्यांच्या मागे पत्नी उषा व कनिष्ठ बधू जयंत असा परिवार आहे. (बंधू जयंत यांच्या दि. ६-१-०७ च्या पत्रावरून)

**३**.प्रतिष्ठानचे परळ येथील कार्यकारिणी सदस्य श्री. चिंतामण महादेव मराठे (पृ.२२२) यांच्या आत्याबाई **अनसूया त्र्यंबक सहस्त्रबुद्धे** यांचे दि. १० फेब्रुवारी २००७ रोजी देहावसान झाले. त्यानी मरणोत्तर देहदान केले होते.

**४**.सांगली येथील सदस्य श्री यशवंत अनंत मराठे (पृ. ४२६) यांचे वडील **अनंत यशवंत** (वय ८४)यांचे दि. १५-जानेवारी २००७ रोजी निधन झाले. त्यांनी गणेशवाडी येथे शेती व्यवसाय करून किराणा दुकान चालविले.गरिबाना मदत करणारे, मृदुभाषी प्रेमळ असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.त्यांच्या मागे, मुलगा,सून, पांच मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

**५**.लातूर येथील सदस्य श्री.निलेंद्र महादेव मराठे (पृ.२३५)यांचे पुत्र **सुनील निलेंद्र** (वय ३६) यांचे दि.१३-१२-२००६ रोजी अकाली अपघाती निधन झाले.त्यांच्या मागे पत्नी मुलगा मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या आई-वडील, भावंडे यांना हा मोठाच धक्का होय.

**६**.प्रतिष्ठानचे विश्वस्त-कार्याध्यक्ष, ठाण्याचे श्री आनंद यशवंत मराठे यांच्या मातोश्री **श्रीमती सुधा यशवंत** (८५) यांचे दि.६ मार्च २००७ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे मे. यशवंत विठ्ठल मराठे प्रा. लि. या सराफी पेढीचे तीन्ही भागीदार पुत्र, सुना नातवंडे असा परिवार आहे.

वरील दिवंगतांच्या कुटुंबियांच्या दुःखात प्रतिष्ठान सहभागी आहे.

-०००-

## आगामी अंकात काय वाचाल?

आगामी अंकांसाठी आमचे कडे आलेल्या खालील साहित्याला यथावकाश प्रसिद्धी दिली जाईल.

१. आणखी एक नारायण- (व्यक्तीचित्रणा)
 -ग.भा. मराठे, घाटकोपर.

२. धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे (स्थलवर्णन)
 -सी. गो.खांबेटे, अंधेरी

३.सीतेचे पूर्ववृत्त (पौराणिक कथा)
 -सौ. प्रतिभा मराठे, ठाणे

४. माझी अविस्मरणीय युरोप सहल (प्रवासवर्णन)
 -सौ. ललिता विजय मराठे, पुणे

५. राजस्थान सायकल रॅली
 -विंग कमांडर(नि) यशवंत ल मराठे,पुणे

६. विवाह संस्काराचे महत्त्व (वैचारिक लेख)
 -डॉ.सौ. हंसश्री सतीश मराठे, नागपूर

७. राजस्थानातील अनोखे अलवर (स्थलवर्णन)
 -जयंत र. मराठे, पुणे

८. प्रतिष्ठानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

-०००-

## या अंकात


| | पृ. |
|---|---|
| १. संपादकीय भूमिका | १ |
| २. मराठी साहित्यसंमेलनात "मराठे" | १ |
| ३. प्रतिष्ठान वृत्त | २ |
| ४. सभासद वृत्त | ३ |
| ५. मुक्काम पोस्ट-परांजपे नगर-बोरिवली-प(लेख) | ४ |
| ६. टेन्शन फ्री गंपू (ललित लेख) | ५ |
| ७. चित्पावन महासम्मेलन२३-१२-०७(आवाहन) | ५ |
| ८. पुनर्भेट! ( कथा ) | ६ |
| ९. "दुःखा" चे दुःख (कविता) | ८ |
| १० चारोळ्या (कविता) | ८ |
| ११ आजी नाही म्हणून (कविता) | ८ |
| १२ खजुराहो (स्थान-माहात्म्य / प्रवासवर्णन) | ९ |
| १३ हस्ताक्षर स्पर्धा २००७-निकाल(प्रति.सूचना) | ९ |
| १४ तुमचे आमचे संवाद (ललित लेख) | १० |
| १५हेल्पलाईन (प्रतिष्ठान सूचना) | ११ |
| १६मराठे परिवार कट्टा(प्रतिष्ठान सूचना) | ११ |
| १७English Section-Sardarjoke | १२ |
| १८Seven wonders | १२ |
| १९Multi Purpose Card | १३ |
| २०maratheparivar@yahoo.co.in | १३ |
| २१नवा अधिक मास (वैचारिक लेख) | १४ |
| २२मंदोदरीची जन्मकथा (संकलन) | १५ |
| २३सदस्य-संवाद | १६ |
| २४आरोपीच्या पिंजऱ्यात ह.मो.मराठे!((वृत्तांत) | १८ |
| २५कलेकलेने वाढणारी कला (ललित लेख) | १९ |
| २६प्रकाशझोत-पटणी कंप्यूटरचे सतीश जोशी | १९ |
| २७श्रीसमर्थ रामदासांची दत्तभक्ती (अभ्यास लेख) | २० |
| २८गोमंतक मराठे परिवार संमेलन (प्रति. वृत्तांत) | २२ |
| २९आगामी अंकात काय पहाल?(प्रतिष्ठान सूचना) | २३ |
| २९. या अंकात (अनुक्रमणिका) | २४ |


बुक पोस्ट

*(पृ ६ वरून पुढे चालू)*

### महत्त्वाची सूचना (२)

इमेलची सोय असलेल्या वाचक-सदस्यानी आपल्या परिवारातील विवाहित कन्या-बहिणी(माहेरवाशिणी) तसेच परदेशी रहात असलेल्या मुलगे / मुली/ बंधू /भगिनी या सर्व सदस्यांच्या पत्यासह जन्मतारखा, ई-मेल व फोन नंबर खालील ईमेलवर पाठविल्यास त्यांना हा व यापूर्वीचा (डिसेंबर २००६चा) अंक पीडीएफ फाईलमध्ये पाठविण्यात येईल. हीच माहिती ई-मेल नसल्यास साध्या पोष्टाने मुखपृष्ठावरील पत्त्यावर पाठवावी.-संपादक.

1. maratheparivar@yahoo.co.in OR
2. sitaram_khambete@yahoo.com )

If undelivered, please return to:


**मराठे प्रतिष्ठान**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,**
**प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.**